बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.११ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

दगाबाज पाक!!

दिल्लीवरील हल्ल्याचा फियास्को!

पाकिस्तानी 'फतेह'ला भारतीय 'आकाश'ने दाखविले आसमान

आधी शरणागती, ४ तासांत युद्धविरामाचे उल्लंघन | **अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मध्यस्थी** | **सामंजस्य करारावर युद्ध थांबविण्याचा निर्णय पण** | **रात्रभर मध्यस्थीसाठी बोलणी केली**

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:मागील चार दिवसांपासून भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला होता. हल्ले-प्रतिहल्ले सुरूच होते. अशा स्थितीत पाकिस्तानने अमेरिकेसमोर गुडघे टेकत मध्यस्थी करण्याची विनंती केली. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींशी संवाद साधून युद्ध थांबविण्याची विनंती केली. त्यावर डीजीएमओच्या पातळीवर संवाद साधल्यानंतर दोन्ही देशांत सामंजस्य करार झाला आणि भारताने महत्त्वाच्या अटी-शर्थींसह युद्धविराम स्वीकारला. परंतु अवघ्या ४ तासांत युद्धबंदीचे उल्लंघन करीत पाकिस्तानने आपले नापाक इरादे स्पष्ट करून दगाबाजीचा चेहरा जगाला दाखविला. भारतानेही आधीच सावध भूमिका घेतली होती. त्यामुळे शस्त्रसंधीचे उल्लंघन करताच भारताने थेट प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली.युद्धविरामाच्या सामंजस्य करारानुसार शनिवार, दि. १० मे रोजी सायंकाळी ५ वाजता युद्ध थांबविण्याचा निर्णय झाला होता. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारताने शस्त्रसंधीचा निर्णय घेतला. त्यानंतर पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक डार यांनी भारतासोबत शस्त्रसंधी झाल्याची माहिती दिली होती. यावर दोन्ही देशांचे लष्करी अधिकारी १२ मे रोजी एकत्रित येऊन चर्चा करण्याचेही ठरले होते आणि पाकिस्तानच्या विनंतीवरून सैनिकी कारवाई थांबवल्याचे भारत सरकारने स्पष्ट केले होते.

यासंदर्भात भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी माहिती दिली होती. पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी आज दुपारी ३:३५ वाजता भारतीय लष्कराच्या महासंचालकांना फोन केला. दोन्ही बाजूंनी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून जमिनीवर, हवेत आणि समुद्रात सुरू असलेला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आजपासून सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही बाजूंना सूचना देण्यात आल्या आहेत. लष्कराचे ऑपरेशन्स महासंचालक १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील, असे म्हटले होते. परंतु अवघ्या चार तासांत पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले.

तत्पूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधीसाठी मध्यस्थी केल्याचा दावा केला होता. त्यांनी याबद्दल एक्सवर एक पोस्ट करून अमेरिकेने शुक्रवारी रात्रभर मध्यस्थीसाठी बोलणी केली. त्यात भारत आणि पाकिस्तान पूर्ण आणि तात्काळ शस्त्रसंधीसाठी तयार झाले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, असे ट्रम्प म्हणाले होते. परंतु पाकिस्तानने ४ तासांत शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याने सीमेवर पुन्हा तणाव वाढला आहे. पाकिस्तानने सीमा भागात ड्रोन हल्ले सुरू केले. त्यामुळे अनेक ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आले.

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:शनिवारी रात्री पाकिस्तानने दिल्लीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारतीय सैन्याने त्यांचा प्रयत्न हाणून पाडला. पाकिस्तानने दिल्लीच्या दिशेने मिसाइल सोडली होती. पण सशस्त्रबलाची सतर्कता आणि तत्परतेने त्यांचा हल्ल्याचा प्रयत्न अयशस्वी केला. भारताने पाकिस्तानच फतेह-१ मिसाइल पाडलं आहे.भारताने पाकिस्तानचा हा प्रयत्न दिल्लीपासून ३०० किलोमीटर अंतरावरच हाणून पाडला. दिल्लीच्या दिशेने ही मिसाइल जात असल्याचा अंदाज आहे. सिरसामध्येच पाकिस्तानचे क्षेपणास्त्र इंटरसेप्ट करण्यात आले. भारताच्या प्रत्युत्तराच्या कारवाईत पाकिस्तानचे एक फायटर जेटही पाडण्यात आले.

पठानकोट क्षेत्रात आज सकाळी ड्रोन एक्टिविटी दिसली. एअरबेसवर हल्ल्याचा प्रयत्न झाला. हिमाचलच्या माजरा येथे एक मानवरहीत विमान पाडण्यात आले. पाकिस्तानने जम्मूमधील हिंदुंचे श्रद्धास्थान असलेल्या प्रसिद्ध आप शंभू मंदिराला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला. हे मिसाइल मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ पडलं. या पवित्र स्थानाचे काहीही नुकसान झालं नाही. पाकिस्तानने पंजाबच्या अमृतसरमध्ये केलेला हल्ल्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. पाकिस्तान भारताची राजधानी दिल्लीवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतोय. म्हणून त्यांचे बरेच प्रयत्न सुरु आहेत. पण जिथे-जिथे पाकिस्तानचे हल्ले होत आहेत, तिथे-तिथे एअर डिफेन्स सिस्टिम हवेतच पाकिस्तानी मिसाइल्सना नष्ट करत आहे. शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळी पाकिस्तानने भारतात २६ ठिकाणी हल्ल्याचा प्रयत्न केला. ड्रोन आणि मिसाइलद्वारे हल्ले केले. भारताने प्रत्येक हल्ल्याचा सडेतोड प्रत्युत्तर दिलं.

आता ग्रामीण भागातही सीसीटीव्ही

धोरण:बीड जिल्हाधिकारी यांची माहिती

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये सुरक्षा, पारदर्शकता आणि सामाजिक शिस्तीला चालना देण्यासाठी ई-दृष्टी प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महत्त्वाच्या ठिकाणी उच्च दर्जाचे, नाईट व्हिजन सुविधा असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी बीड यांनी दिली. दरम्यान ग्रामसुरक्षा वाढवून चोरी, वाद व गैरकृत्यांवर नियंत्रण ठेवणे शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे आणि महिलां-मुलांच्या सुरक्षिततेसाठी देखरेख, सामाजिक शिस्त आणि नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे. आपत्ती व आपत्कालीन परिस्थितींमध्ये त्वरित प्रतिसाद देणे. आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांचे व रुग्णांचे संरक्षण शासकीय व ग्रामपंचायतीच्या मालमत्तेचे रक्षण.स्वच्छता व नियमांचे » पान २ वर

प्रकल्पाची कालमर्यादा

ई-दृष्टी प्रकल्पामुळे ग्रामपंचायत क्षेत्रात सुरक्षा, पारदर्शकता आणि जबाबदारी यांचा दर्जा मोठ्या प्रमाणात उंचावेल. हा प्रकल्प वेळेत व काटेकोरपणे पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना केले आहे.

परळीच्या चारही धरणात पाणीसाठा पुरेशा!

दिलासा:तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांची माहिती

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: परळी तालुक्यातील प्रमुख तीन पाणी प्रकल्पा मध्ये पुरेशा पाणी साठा असून तालुक्यातीलच सिरसाळा गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या सुकळी (ता . धारुर) तलावात देखील पुरेशा पाणी साठा असल्याची माहिती परळी तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिली आहे. नागापूर , चांदापूर ,बोरणा (ता. परळी) व सुकळी (ता. धारुर) अशी हि चार प्रकल्प आहेत. ह्या चार प्रकल्पातून परळी तालुक्यातील अनेक गावांना पाणी पुरवठा होतो . नागापूर च्या वाण धरणातून १२ गावासह परळी शहराला पाणी पुरवठा केला जातो .सद्या उन्हाचा तिव्र पारा वाढला असून पाणी पातळी देखील खालावली आहे , पाणी पातळी खालवल्याने विहिर/बोअर पाणी स्त्रोतावर परिणाम पडला आहे. परंतु तालुक्यातील प्रमुख धरणात पाणी साठा पुरेशा असल्याने याची चिंता नाही . ज्या गावात काहिशी टंचाई सदृश परिस्थिती आहे अशा तालुक्यातील ११ गावातील पाणी स्त्रोत अधिग्रहण प्रस्ताव आले आहेत, लवकर या संबधी कार्यवाही होणार असुन प्रस्तावित अधिग्रहण स्त्रोतातून पाणी पुरवठा संबंधित स्थानिक लोकांना होणार आहे. तिव्र उन्हाळा असल्याने तालुक्यातील पाणी परिस्थितीवर तालुका प्रशासन लक्ष » पान २ वर

सरपंच अपात्रतेचे आदेश रद्द

दिलासा:संजय साडेगावकरांचे अपील मंजूर

पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी:वालूर तालुका सेलू जिल्हा परभणी येथील सरपंच व शिवसेना माजी जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर यांना परभणी जिल्हाधिकारी यांनी अपात्र केले होते सदरील अपात्रतेचे आदेश माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी रद्द करून अपील मंजूर केले व संजय साडेगावकर यांना सरपंच पदी कायम केले आहे.

प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की सरपंच संजय साडेगावकर व त्यांच्या पत्नी सदस्य महानंदा साडेगावकर यांच्या विरोधात गावातील राजकीय विरोधक असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांनी कलम १४ ज एक महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम नुसार माननीय जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे तक्रार दाखल करून विनंती केली की सरपंच संजय साडेगावकर व त्यांच्या पत्नी महानंदा साडेगावकर व त्यांच्या आई कौशल्याबाई साडेगावकर यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे व त्यांच्या बऱ्याचशा प्रॉपर्टी मालमत्ता ह्या शासकीय जमिनीवर ती अतिक्रमण करून उभा राहिलेल्या आहेत या आशयाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर माननीय जिल्हाधिकारी यांनी बीडीओ तसेच इतर अधिकारी यांना अहवाल मागितला सदरील अहवालावरून माननीय जिल्हाधिकारी परभणी यांनी सरपंच संजय साडेगावकर व पत्नी सदस्य महानंदा साडेगावकर यांना अपात्र केले होते.

सदर अपात्रतेच्या निकालाच्या नाराजीने संजय साडेगावकर व महानंदा साडेगावकर यांनी अँड.श्रीकांत » पान २ वर

बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना;गौतम बुद्धांच्या मूर्तीची निघणार मिरवणूक

समाजबांधवांनी उपस्थित रहावे: पप्पु कागदे

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साठी धर्मातरांची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही ही घोषणा केरून १४ आक्टोबर १९५६ साठी नागपूर मुकामी तथागताच्या बुद्ध धम्माची दिक्षा घेऊन सारा भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला होता. तथागताच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी तथागताच्या सम्यक सम्बुद्ध जयंतीचे औचित्य साधून आज रविवार दि.११ मे २०२५ रोजी सकाळी ठिक ८:३० वाजता बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भिमराज नगरपर्यंत काढण्यात येऊन बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा भिमराजनगर (राजुरीवेस) बीड येथील बुद्ध विहारात करण्यात येणार आहे.

बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणाच्या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून » पान २ वर

धोरण | ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ पायी यात्रा

राज्यभरात आज तिरंगा रॅली

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यातील महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ रविवार दि. ११ मे रोजी पायी यात्रेचे आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही या रॅलीत सहभाग असणार आहे. यांसह, महायुतीमधील अनेक मंत्री आपल्या आपल्या जिल्ह्यातून या रॅलीत सहभाग घेणार आहेत. मात्र, राष्ट्रवादीकडून तिरंगा रॅलीचे नियोजन नसून अजित पवार हे नांदेड दौऱ्यावर आहेत. ते शहीद कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या » पान २ वर

अजित पवार नांदेड दौऱ्यावर

राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या रविवारी नांदेड दौऱ्यावर आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने चिखलीकर यांच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. उद्या रविवारी मुखेड तालुक्यातील चव्हाणवाडी येथे राष्ट्रवादी पक्षाचा प्रवेश सोहळा पार पडणार आहे. त्यासाठी, अजित पवार यांची उपस्थिती असणार आहे. तसेच, अजित पवार हे देगलूर येथील शहीद जवान सचिन वनंजे यांच्या कुटुंबीयांना सांत्वन पर भेट देणार आहेत, अशी माहिती आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली.

बीड जिल्ह्यात ६९० प्रकरणे निकाली

निर्णय:बीडमध्ये लोक अदालत

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १० मे २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून ६९० प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत. बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण १०३०६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय. ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश » पान २ वर

पाकिस्तान विनाशाकडे

पाकिस्तानचे राज्यकर्ते, लष्कर प्रमुख आणि कट्टरतावादी नेते पाकिस्तानला विनाशाच्या मार्गावर नेत आहेत. भारतात दहशतवाद्यांना पाठवून हिंसाचार आणि रक्तपात घडवायचा, लष्करी दलाच्या तळांवर हल्ले करायचे, निरपराध भारतीयांचे बळी घ्यायचे ही मालिका वर्षानुवर्षे चालूच आहे. उरी, पठाणकोट, पुलवामा, पहलगाम अशा हत्याकांडानंतर देशभरात संतापाची लाट उसळली.

दहशतवाद्यांना पाठिंबा आणि संरक्षण देणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवा, अशी मागणी सर्वस्तरातून सुरू झाली. आता खूप झाले, आता यापुढे पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही अशीच भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात प्रबळ होत गेली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असिम मुनीर यांची प्रक्षोभक व भडकाऊ भाषणे ही दहशतवादाला उत्तजेन देणारी होती. भारताच्या विरोधात गरळ ओकणारी होती. एका देशाचा लष्कर प्रम ुख शेजारी राष्ट्राच्या विरोधात भडकाऊ भाषणे कशी करू शकतो ? असिम मुनीर यांची प्रतिमाच जिहादी जनरल अशी आहे. पहलगाम येथे निरपराध हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी पॉईंट ब्लँक गोळ्या घालून त्यांची हत्या केली. महिलांच्या पतीला त्यांच्या डोळ्यांदेखत समोरून गोळ्या घालून त्यांचे कुंकू पुसले. भारतीय संस्कृतीत कुंकू हे अतिशय पवित्र मानले जाते. ते सन्मानाचे व विश्वासाचे प्रतीक आहे. त्या महिलांचा आक्रोश व अश्रू सर्व देशाने बघितले. दहशतवाद्यांना पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण आणि एके ४७ सारख्या स्वयंचलित बंदुका देऊन हिंसाचार घडविण्यासाठी भारतात पाठवले जाते याचे सज्जड पुरावे भारताने जगाला दाखवले आहेत. जा मोदींना जाऊन सांग, असे दहशतवाद्याने पहलगाममधील महिलांना बजावले हा त्यांच्या क्रूरतेचे कळस होता. त्याचा बदला घेण्यासाठीच भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. सात शहरातील नऊ दहशतवादी तळ उद्धवस्त केले. त्यानंतरही पाकिस्तानी सैन्याने सरहद्दीलगत भारताच्या हद्दीतील पंजाब व काश्मीरमधील वस्त्यांवर गोळीबार केला व त्यात निरापराध लोकांचे बळी घेतले. भारताने गुरुवारी रात्री लाहोर, कराची, इस्लामाबाद, फैसलाबाद, पेशावर, रावळपिंडी अशा सर्व महत्त्वांच्या शहरांवर हवाई हल्ले चढवले. भारताने ड्रोन व क्षेपणास्त्रांचा पाकिस्तानी लष्करी तळांवर मारा केला. लाहोरपासून इस्लामाबादपर्यंत पाकिस्तानात ब्लॅक आऊट जारी करण्यात आला. इस्लामच्या नावावर दहशतवादी कारवाया घडविणाऱ्या पाकिस्तानला भारतीय हल्ल्यांपासून स्वत:ला वाचविण्यासाठी रात्री अंधारात राहावे लागले. भारत–पाकिस्तान दरम्यान अघोषित युद्ध सुरू झाले. भारताने पाकिस्तानची पाच लढाऊ विमाने पाडली. कराची बंदराच्या दिशेने भारताच्या विक्रांत युद्ध नौकेने कूच केले आहे. चीन व तुर्की वगळता जगातील कोणत्याही देशाने पाकिस्तानला पाठिंबा दिलेला नाही. भारतावर झालेले दहशतवादी हल्ले आणि विशेषत: पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी धर्म विचारून केलेली २६ हिंदू पर्यटकांची हत्या याने देशातील जनतेचा थरकाप तर झालाच पण पाकिस्तानवर हल्ला करून कठोर बदला घ्यावा अशी जनता मागणी करू लागली. जे जनतेला पाहिजे आहे तेच मोदींनी करून दाखवत आहेत. ऑपरेशन सिंदूर सुरू होताच सारा देश मोदींच्या नेतृत्वाचा जयजयकार करू लागला. मोदींच्या अभिनंदनाचे फलक सर्व देशभर झळकू लागले. पाकिस्तानकडून होणारी घुसखोरी भारतीय सैन्याने रोखलीच पण पाकिस्तानचे साठ हून अधिक ड्रोन नेस्तनाबूत करून हल्ले परतवून लावले.

तंत्रज्ञानाचा दुरुपयोग टाळावा!



राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन दरवर्षी ११ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमातील यश आणि भारतीय शास्त्रज्ञांच्या योगदानाचा गौरव करतो. पोखरण अणुचाचणीची घटना साजरी करण्यासाठी मे ११ हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून देशभरात साजरा केला जातो.११ मे १९९८ रोजी पोखरणमध्ये (राजस्थान) भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमातील यशस्वी चाचण्या झाल्या, त्यानंतर हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो.माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी १९९८ मध्ये ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला आणि तो भारताच्या वैज्ञानिक कालक्रमात एक महत्त्वाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी अणुऊर्जा कार्यक्रमात आपल्याला यश आले. आजच्या दिवशी भारताने पोखरण येथे अणुऊर्जा कार्यक्रमातील यशस्वी चाचण्या केल्या, ज्यामुळे भारताची अणुऊर्जा क्षेत्रात प्रगती झाली.हा दिवस भारतीय शास्त्रज्ञांच्या योगदानाचा गौरव करतो आणि विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये केलेल्या प्रगतीचे स्मरण करतो.

हा दिवस तंत्रज्ञानाच्या विकासाला प्रोत्साहन देतो आणि नवीन कल्पना व तंत्रज्ञान विकसित करण्यास प्रोत्साहित करतो. हा दिवस भारतीय शास्त्रज्ञांच्या योगदानाचा सन्मान करतो आणि त्यांना प्रेरणा देतो.राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसाची उत्पत्ती ११ मे १९९८ पासून सुरू झाली, जेव्हा भारताने राजस्थानमधील पोखरण चाचणी श्रेणीमध्ये यशस्वी अणुचाचण्या केल्या. ऑपरेशन शक्तीचे सांकेतिक नाव असलेल्या या चाचण्यांमध्ये थर्मो न्यूक्लियर उपकरणासह पाच स्फोटांचा समावेश होता. या चाचण्यांनी अण्वस्त्रे विकसित करण्याची आणि तैनात करण्याची भारताची क्षमता दाखवून दिली, जी देशाच्या संरक्षण आणि सुरक्षा रचनेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. ऑपरेशन शक्तीच्या यशाने भारताला अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या लीगमध्ये सामील करून घेतले आणि जागतिक स्तरावर प्रशंसा आणि टीका दोन्ही मिळवली.

तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली या चाचण्या घेण्यात आल्या आणि प्रादेशिक आणि जागतिक आव्हानांचा सामना करताना भारताचे सार्वभौमत्व आणि सुरक्षा राखण्याच्या कटिबद्धतेची पुष्टी केली. राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा केल्याने देशासमोरील विविध आव्हाने, आरोग्यसेवा आणि शेतीपासून ते पायाभूत सुविधा आणि पर्यावरणापर्यंतच्या विविध आव्हानांना तोंड देण्यासाठी तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांचे महत्त्व अधोरेखित करतो. हे सामाजिक– आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून तंत्रज्ञानाची भूमिका अधोरेखित करते आणि जागतिक नाविन्यपूर्ण शर्यतीत पुढे राहण्यासाठी संशोधन आणि विकासामध्ये सतत गुंतवणूक करण्याच्या गरजेवर जोर देते.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारत प्रगती करू शकला तो तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीमुळे. तंत्रज्ञान हे सर्वसामान्यांच्या मेहनतीला हातभार लावणारे व्हावे. तंत्रज्ञानाचा

पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

उपयोग विधायक कामांसाठी करण्यासाठी त्याबाबत माहिती दिली पाहिजे. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग सध्या मोठ्या प्रमाणात होतो आहे.त्याचे नुकसानही मानवाला भोगावे लागत आहेत. जागात सध्या अस्थिरता दिसत असून, प्रत्येक राष्ट्र तंत्रस्नेही झाले आहे. पण, विज्ञान तंत्रज्ञानातील ही झेप एकमेकांच्या विरोधात उभी केली जात आहे. सध्या भारत पाकिस्तान यांच्यात युद्धसदृश्य परिस्थिती असून, तंत्रज्ञानाचा वापर पाकिस्तान भारताला किंबहुना इतरही देशांत कुरापती करतो. दहशवादाला थारा देऊन इतर राष्ट्रांना नाहक छळतो. तंत्रज्ञानाचा वापर दहशतीसाठी केला जात असेल तर त्यावर जगाने बहिष्कार घातला पाहिजे. तंत्रज्ञानाचा पाकिस्तानला होणारा पुरवठा इतर राष्ट्रांनी रोखला पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर संरक्षणासाठी पण स्वत:च्या.इतरांना डिवचण्यासाठी नव्हे.भारताने पाकिस्तानातील दहशतवादी केंद्र उद्धवस्त केले त्यात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.

तंत्रज्ञानाचा वापर शेतकरी कष्टकरी यांच्यासाठी करण्यात आला तर देशाच्या प्रगतीत त्याची भर पडेल. तंत्रज्ञान मानवाच्या जीवनात क्रांती घडवून आणते.हे आपण जाणतो. भारत आज पाकिस्तानाचे हल्ले परतवून लावू शकलो ते उच्च तंत्रज्ञानामुळे. संरक्षण क्षेत्रात भारताने तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक क्षेपणास्त्रे बनवली ज्यामुळे पाकिस्तानच्या हल्ल्याला परतवून लावू शकलो. अवकाश संशोधन क्षेत्रात भारताने मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर करून अंतराळ मोहिमा पूर्ण केल्या आहेत. जगातील कोणत्याही तंत्रज्ञानाच्या बरोबरीने भारत तंत्रज्ञान क्षेत्रात झेप घेत आहे. मनोरंजन क्षेत्रात भारताने एआय तंत्रज्ञान क्षेत्रात स्वत: ची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सध्या जगभरात एआय तंत्रज्ञानाची चर्चा सुरू असताना, त्याचा चांगला उपयोग करण्यापेक्षा ते तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहोचत नाही तोवर दुरुपयोग केला जात आहे.याबाबत जागरूक असणे आवश्यक आहे. एआय तंत्रज्ञानाचा म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून पाकिस्तान भारतीयांची दिशाभूल करत आहे.त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर काही मर्यादा अधोरेखित केल्या पाहिजेत.अन्यथा तंत्रज्ञान आपल्यावर हावी होईल.याची दक्षचा भारताने आणि टेक्नोसेव्ही जगाने घ्यावी. एवढेच .

पान एक वरून

आता ग्रामीण भागातही

पालन यावर देखरेख.कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण ठेवून पारदर्शकता वाढवणे.प्रकल्पाअंतर्गत शाळा, अंगणवाडी, चावडी, आरोग्य केंद्र/उपकेंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, प्रमुख चौक व सार्वजनिक स्थळे या ठिकाणी किमान ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामस्तरीय समितीमध्ये सरपंच अध्यक्ष आणि ग्रामविकास अधिकारी सदस्य सचिव म्हणून कार्य करतील.प्रत्यक्ष कॅमेरे बसविण्याची जबाबदारी ग्रामस्तरीय समितीची असेल. दरम्यान कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग किमान १५ दिवस जतन करणे आवश्यक आहे. निधी उभारणीसाठी उड्ठ, लोकसहभाग, स्वयंसेवी संस्था तसेच सामान्य निधी/डीव्हीडीएफ/१५ वा वित्त आयोग व्याज वापरण्याचे निर्देश. १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिओटॅग फोटोसह कॅमेऱ्यांची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

परळीच्या चारही धरणात पाणीसाठा

ठेवून आहे . पाणी टँकर सुरु करण्याची सद्या परिस्थितीत तरी कुठेही आवश्यकता आहे असे दिसून आले नाही .

पाणी पुरवठा आता सुरळीत राहिल : सरपंच पट्टेदार : सिरसाळा गावाला सुकळी तलावातून व गोवर्धन पाणी स्त्रोतून पाणी पुरवठा केला जातो . काही दिवसापुर्वी रस्ता तसेच फोन कंपन्यांचे काम सुरु असल्याने अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटली होती या मुळे सुरळीत पाणी पुरवठा करण्यास अडचण होती . परंतु आता पाईपलाईन यंत्रणा वेवस्थीत आहे त्या मुळे पाणी पुरवठा सुरळीत सुरु केला आहे . जलजीवन मिशन अंतर्गत चे पाणी पुरवठ्याचे काम सुरु आहे ते काही ठिकाणी थांबले आहे संबंधित गुत्तेदारांनी लवकरात लवकर सदरील काम करावे जेणे करुन पोहनेर गोदावरी नदीतून सिरसाळा गावाला मुबलक पाणी पुरवठा होईल.

सरपंच अपात्रतेचे आदेश

कवडे यांच्यामार्फत माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांच्यासमोर कलम १६ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिन अधिनियम नुसार अपील दाखल केले होते सदरील अपिलावर अपिलार्तीचे म्हणणे तसेच तक्रारदार यांचे म्हणणे व शासकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन माननीय विभाग आयुक्त यांनी आपली आपलिकेट श्री संजय साडेगावकर व महानंदा साडेगावकर यांच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेश रद्द केले व अपील मंजूर करून सरपंच संजय साडेगावकर यांचे सरपंच पद कायम केले. सदरील प्रकरणात संपूर्ण परभणी जिल्ह्याचे लक्ष लागलेले होते शिवसेना माजी जिल्हाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सभापती राहिलेल्या संजय साडेगावकर यांना मोठा दिलासा मानला जात आहे त्यांच्यातर्फे अँड.श्रीकांत जी कवडे यांनी काम पाहिले.

बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना;गौतम बुद्धांच्या मूर्तीची

पुज्य भिक्खू धम्मशिल थेरो (शिवणी) हे उपस्थित राहणार असून प्रमुख धम्मदेशनासाठी पुज्य डॉ. भिक्खु इन्दवंन्स महाथेरो (कुशीनगर) पुज्य भिक्खू चंद्रमुनी (हिंगोली) पुज्य भिक्खू धम्मघोष (हिंगोली) पुज्य भिक्खु पय्यावर्धन (हिंगोली) उपस्थित राहणार आहेत. आज रविवार दि ११ मे २०२५ रोजी सकाळी ठिक ८:३० वाजता छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भिमराजनगर (राजुरीवेस) पर्यंत काढण्यात येणाऱ्या बुद्ध मूर्तीच्या भव्य मिरवणूकीस व बुद्धमूर्तीच्या प्रतिष्ठापणाच्या कार्यक्रमास समाज बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमांचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, रमेश गंगाधरे,राजू जोगदंड, किसन तांगडे यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात ६९० प्रकरणे

होता. त्यापैकी ३८९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण १४८५८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३०१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण ६९० प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये ५ कोटी ८४ लाख ७३ हजार १५८ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, श्रीमती. एस. आर. पाटील , जिल्हा न्यायाधीश –१, श्रीमती एस.आर.शिंदे , जिल्हा न्यायाधीश, के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश ४ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर.डी.येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती. न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

राज्यभरात आज तिरंगा

उपस्थितीत उद्या रविवारी नागपुरात तिरंगा रॅली निघणार असून ऑपरेशन शिंदूर'च्या समर्थनार्थ ही तिरंगा रॅली काढण्यात येत आहेत. या तिरंगा रॅलीत मोठ्या प्रमाणात नागपूरकर सहभागी होणार आहेत. शहरातील लॉ कॉलेज चौक ते शंकर नगर चौक दरम्यान तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: सकाळी ८ वाजता तिरंगा रॅलीत पायी सहभागी होणार आहेत.राज्यभरात ठिकठिकाणी उद्या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतही उद्या तिरंगा रॅली निघणार असून ठाण्यातील जिल्हाधिकारी कार्यालापासून रॅलीला सुरुवात होणार आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत खासदार नरेश म्हस्के, हेमंत पवार आणि इतर शिवसेना पदाधिकारी असणार आहेत. ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या रॅलीत सहभागी होण्याचे आवाहनही शिवसेना शिंदे गटाकडून करण्यात आले आहे. रत्नागिरित मंत्री उदय सामंत यांच्याकडून तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रप्रेमासाठी एकत्र येण्यासाठी तसेच भारतीय सैन्यदलाचे मनोबल वाढवण्यासाठी रत्नागिरी शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. उद्या ११ मे सकाळी ८ वाजता मारुती मंदिर सर्कल ते जयस्तंभ चौकापर्यंत रॅली काढण्यात येईल.या रॅलीमध्ये रत्नागिरीवासियांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तर, कोल्हापूरच्या ऐतिहासिक दसरा चौकामधून उद्या शिवसेना शिंदे गटाच्यावतीने तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. दसरा चौकापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत ही तिरंगा रॅली काढली जाईल.

पान सहा वरून

शिवणीमध्ये बुद्ध जयंती महोत्सव

गायकवाड उपस्थित असणार आहेत. दरम्यान बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

स्पर्धा परीक्षेत मिळविले यश

नक्की मिळेल असे दै.पुण्यभूमीशी बोलताना सांगितले.या प्रवासात ज्यांनी मला अविरत साथ दिली माझ्यावर विश्वास ठेवला आणि मला ज्या शिक्षकांनी मार्गदर्शन केले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले व पुढील वाटचालीस दै.पुण्यभूमी परिवाराच्या वतीने कळंब तालुका प्रतीनीधी रामराजे जगताप यांच्या वतीने कु.अरुणा मिटकरी हिला शुभेच्छा दिल्या.

छेडछाडी आरोपातून निर्दोष

आरोपपत्र दाखल केले, त्यानंतर प्रकरणात फिर्यादी,तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांचे जबाबा नंतर चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री एम ए कुलकर्णी साहेब यांच्या समोर आरोपीचे विधिज्ञ ड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, श्री एम ए कुलकर्णी साहेब यांनी दि. ०८मे रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपी गजानन नारायण धुमाळ यांची निर्दोष मुक्तता केली.

परळीचे नाव सकारात्मक दृष्टीने

विवाह सोहळ्यात ११ नवदाम्पत्य विवाह बंधनात अडकले. ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी वस्तू तर देण्यात आल्याच मात्र त्यासोबतच नववधूच्या नावाने ७० हजार रुपयांची मुदत ठेव ठेवण्यात आली. विशेष म्हणजे हा सोहळा संपन्न होत असताना हुंडा देणार नाही आणि घेणार नाही अशी सर्वांनी शपथ घेतली. या विवाह सोहळ्यास सामाजिक कार्यकर्ते तथा नामांकित शल्यविशारद डॉ.हरिश्चंद्र वगे, डॉ.संतोष मुंडे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रूपणर, खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक केले जात असून, गोरगरीब कुटुंबातील मुला मुलींच्या विवाहास मोठा हातभार लागल्यामुळे ग्लोबलचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांचे सर्वांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

शहीद जवानाच्या स्मरणार्थ

भारिप युवक अध्यक्ष संतोष जोगदंड, ज्येष्ठ नेते राहुल वडमारे, युवा कार्यकर्ता सुमित उजगरे, तालुका संघटक आकाश साबळे, प्रवीण गायकवाड, नितीन कांबळे, प्रेम कांबळे यांनी रक्तदान केले. यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, जिल्हाध्यक्ष अनिता चक्रे, जिल्हाउपाध्यक्ष पुष्पाताई तूरूकमाने, सोनाजी सोनवणे, मिलिंद सरपते यांच्यासह बरेच पदाधिकारी हे रक्तदान करण्याचे राहिले असून रविवारी व सोमवारी रक्तदान करणार आहेत अशी माहिती वंचित जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिली.

ऊसतोड,वाहतूक करार

हा आहे.समन्वय, पारदर्शकता व सहकार्याच्या तत्वांवर हा करार आधारित असून, कारखाना, शेतकरी, तोडणी मजूर व वाहतूकदार यांच्यातील बंध अधिक दृढ करणारा ठरेल, याचा विश्वास आहे असे शेतकी अधिकारी जाधव यांनी सांगितले आणि सर्व ऊस उत्पादक, वाहतूकदार व तोडणी मजुरांना पुढील गळीत हंगामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

११२ कोटी कामाचा दर्जा

करण्यात आला नाही. नाली काम अनेक ठिकाणी ढासळले आहे. सिमेंट रोडची लेवल नाही. नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावरचे थर उडवलेत, अशी तक्रार ग्रामीण भागातील नागरिकांनी केलेली आहे. डांबरीकरण करायच्या आधी व्यवस्थित खडीकरण करून, त्याची दबाई करण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी माती मिश्रित खडी वापरली आहे. पुलाचे काम वेळेवर करण्यात आलेले नाही. वळण रस्ता वापरताना, कंत्राटदाराने साधे डायव्हर्शन दाखवण्याचे सौजन्य दाखवले नाही. त्यामुळे, या रस्त्यावर अनेक अपघात होऊन, यामध्ये एका तरूणाचा बळी गेला आहे. कंत्राटदाराने अनेक ठिकाणी मनमानी केली आहे. तरी या सर्व कामाची चौकशी व्हावी अशी मागणी शिवसेना तालुका अध्यक्ष अजय भैय्या दाभाडे यांनी केली आहे.

बीडमध्ये मोटरसायकल

बीडमध्ये उद्या दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता तिरंगा रॅली काढून भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुतळ्यापासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. माळीवेस, सुभाष रोड, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

शिवसेना पदाधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता

नवी मुंबई : पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेध आंदोलनप्रकरणी गुन्हे दाखल झालेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांची बेलापूर न्यायालयाने शुक्रवारी निर्दोष मुक्तता केली आहे. सन २०१७ साली अमरनाथ यात्रेकरुंवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी भ्याड हल्ला केला होता. या हल्ल्याचा तीव्र निषेध म्हणून शिवसेनेच्या वतीने राज्यात ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले होते. नवी मुंबईमधील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये निषेध आंदोलन केले होते. या आंदोलनामध्ये शिवसैनिकांनी पाकिस्तानचा झेंडे जाळून आपला रोष व्यक्त केला होता. यातील शहरप्रमुख विजय माने, माजी विरोधी पक्षनेते व उपजिल्हाप्रमुख दिलीप घोडेकर, महिला जिल्हा संघठक रंजना शिंत्रे, समीर बागवान, गणपत शेलार, संतोष मोरे या आंदोलनकर्त्यांवर त्यावेळी गुन्हे दाखल करण्यात आले होते. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय बेलापूर, वाशी न्यायालयात दोषारोप दाखल होऊन सुनावणी घेण्यात आली. अखेर शुक्रवारी त्यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. एकीकडे देशपातळीवर पाकिस्तानच्या अतिरेकी कारवायांवर भारतीय सेना चोख प्रत्युतर देत असतानाच न्यायालयीन लढाई जिंकणे आनंददायक आणि अभिमानास्पद असल्याची भावना शिवसेना शहरप्रमुख विजय माने यांनी व्यक्त केली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील दळणवळणास चालना

जून २०२५ पर्यंत दर्जेदार कनेक्टिव्हिटी पूर्ण होणे अपेक्षित

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पश्चिमेकडून कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याकरिता विकसित करण्यात येत असलेल्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे (वेस्टर्न एन्ट्री इंटरचेंज) काम जून २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदलाद्वारे आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा परिचालनाच्या मार्गावर असून विमानतळाला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभावी याकरिता त्या परिसराच्या परिघातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळासोबत जोडण्याकरिता परिघीय मार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर (पोर्ट) कनेक्टिव्हिटी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे.

एनएचएआयतर्फे या अंतर्गत आम्र मार्ग, राज्य महामार्ग-५४ व राष्ट्रीय महामार्ग-४बी यांच्या विस्तारिकरणाकरिता निधी संकलन आणि अंमलबजावणीसाठी मुंबई-जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लि. (एमजेपीआरसीएल) या विशेष उद्देश वाहन (एसपीव्ही) कंपनीची स्थापन करण्यात आली आहे. एमजेपीआरसीएलमध्ये एनएचएआय, जेएनपीटी आणि सिडको यांची अनुक्रमे ६७.०४%, २६.९१% आणि ६.०५% इतकी भागीदारी आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिघातील महत्त्वाचे मार्ग आणि विमानतळ यांदरम्यान कनेक्टिव्हिटी प्रस्थापित व्हावी याकरिता सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळादरम्यान कनेक्टिव्हिटी निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. आम्र मार्ग (राष्ट्रीय महामार्ग ३४८ए) आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीतरीत्या चालावी याकरिता एमजेपीरसीएलच्या प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. विमानतळाच्या पूर्व बाजूस राष्ट्रीय महामार्ग ४बी (राष्ट्रीय महामार्ग ५४८) सोबत कनेक्टिव्हिटी पुरविण्यासाठी पूर्व प्रवेश आंतरबदल मार्गाचा देखील समावेश करण्यात आला आहे.

पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग हा हाफ क्लोव्हरलिफ प्रकारातील असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या बहुउद्देशीय कनेक्टिव्हिटीचा महत्त्वाचा घटक आहे. सदर पश्चिम प्रवेश आंतरबदल हा उलवे किनारी मार्गाच्या १.२ कि.मी.च्या उन्नत विमानतळ जोड रस्त्याला जोडला गेला आहे.

आम्र मार्गावरून विमानतळाच्या दक्षिण बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता लूप ए व आम्र मार्गावरून विमानतळाच्या उत्तर बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता रॅम्प ए चा वापर करता येणार आहे. लूप बी आणि रॅम्प बी द्वारे विमानतळाकडून आम्र मार्गाच्या अनुक्रमे उत्तर व दक्षिणेकडे जाण्याकरिता निर्गम मार्गांचा पर्याय असणार आहे.

> परिपूर्ण कनेक्टिव्हिटी लाभावी याकरिता सिडकोतर्फे अनेक कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यासाठी मुख्य प्रवेशमार्गांची नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास थेट जोडणी होणार असल्याने त्यातील पश्चिम प्रवेश आंतरबदल आणि पूर्व प्रवेश आंतरबदल हे त्यांपैकी महत्त्वाचे प्रकल्प आहेत. या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांमुळे संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशातून विमानतळाकडे होणारी वाहतूक सुरळीतरीत्या पार पडणे सुनिश्चित होणार आहे.
>
> **- श्री. विजय सिंघल,**
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

संशयास्पद आढळल्यास सतर्क राहण्याचे आवाहन

तीन ड्रोन फिरत असल्याच्या अफवेने नागरिकांमध्ये घबराट

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

गुरुवारी रात्री पाकिस्तानची लष्करी विमाने, ड्रोन भारताकडून नेस्ताबूत करण्यात आली. याविषयीच्या बातम्या, काही दूरचित्रवाहिन्यांवर कल्याण, डोंबिवलीतील नागरिक मध्यरात्री उशिरापर्यंत पाहत होते. याचवेळी कल्याण पश्चिमेत आधारवाडी भागात आकाशात तीन ड्रोन फिरत असल्याची अफवा पसरली आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात गुरुवारी रात्री जोरदार हवाई हल्ले सुरू होते. दूरचित्रवाहिन्यांवरून हे थेट प्रक्षेपण पाहत असताना धडकी भरविणारे येणारे भोंग्यांचे आवाज. त्यानंतर हवेतल्या हवेत भारताकडून पाकिस्तानची क्षेपणास्त्रे, ड्रोन नष्ट करण्याची चपळाई. उत्तर भारतात युद्धामुळे बंद करण्यात आलेला वीज पुरवठा ही सगळी दृश्ये नागरिक पाहत होते. याचवेळी कल्याणमधील काही नागरिकांना कल्याण मधील आधारवाडी भागात आकाशात तीन ड्रोन फिरत असल्याची जाणीव झाली.

कल्याणमध्ये दोन दिवसांपूर्वी युध्दसरावाचे प्रशिक्षण जिल्हा आपत्कालीन विभागातर्फे करण्यात आले. यावेळी युद्धाच्या परिस्थितीत नागरिकांनी कोणती काळजी घ्यायची याविषयी माहिती प्रात्यक्षिकांद्वारे देण्यात आली होती. कल्याण शहरातील आधारवाडी भागात रात्री १२ ते १२.३० वाजेदरम्यान तीन ड्रोन सदृश्य काही हालचाली आकाशात होत असल्याचे समजले. या हालचाली पाहत असताना नागरिकांमध्ये काही वेळ घबराट पसरली होती.

हे ड्रोन काही संशयित हालचाली करत असल्याचे वाटल्याने जागरूक नागरिकांनी तातडीने पोलिसांच्या सेवा संपर्क क्रमांकावर संपर्क साधला.

अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांना यासंदर्भातची माहिती देण्यात आली. पोलिसांनी बारकाईने अवलोकन केले. त्यावेळी ती नियमित विमान होती. एक विमान कमी उंचीवरून जात होते. तर, दोन विमाने आपल्या नियत मार्गाने इच्छित स्थळी चालली होती, असे निदर्शनास आले. हे ड्रोन नसून ती विमाने असल्याचे समजल्यावर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. नागरिकांना आपल्या आसपास, शहरात काही संशयास्पद हालचाली आढळून आल्या तर त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा. कोणत्याही अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

वेचक

पथदिव्यांच्या दुरुस्तीची काँग्रेसची मागणी

नवी मुंबई : नेरूळ सेक्टर २, ४ तसेच जुईनगर नोडमधील पथदिव्यांच्या दुरुस्तीची लेखी मागणी नवी मुंबई जिल्हा काँग्रेसच्या सचिव श्रीमती विद्या भांडेकर यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे. नेरूळ सेक्टर २, ४ तसेच जुईनगर नोडमधील रस्त्यावरील, पदपथावरील तसेच अंतर्गत भागातील पथदिव्यातील दिवे अनेक ठिकाणी दिवे बंद आहेत. जे सुरु आहेत, त्यातून पूर्ण प्रकाश न येता अंधूकसा प्रकाश येत आहे. त्यामुळे दिवे सुरू असूनही अंधारच पडतो. कालपासून अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. नेरूळ सेक्टर २, ४ तसेच जुईनगर नोडमध्ये नादुरुस्त पथदिव्यांची समस्या गंभीर झालेली आहे. अंधारात समाजविघातक अपप्रवृत्तींकडून महिला व मुलींबाबत दुष्कृत्य होण्याची भीती आहे. वाटमारी, लुटमार होण्याचीही शक्यता आहे. समस्येचे गांभीर्य पाहता संबंधितांना नादुरुस्त पथदिव्यांच्या समस्येचे निवारण करण्याचे निर्देश देण्याची मागणी श्रीमती विद्या भांडेकर यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

गतका खेळाडूंचे 'खेलो इंडिया'मध्ये रुपेरी यश

कल्याण : गतका खेळामधील फरिसोटी टीम या क्रीडा प्रकारांमध्ये मुलींच्या संघाने रजत पदक प्राप्त केले आहेत. गतका खेळात महाराष्ट्राला प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेमध्ये यश संपादन झाले आहे. श्रमिका पाटील, तन्मयी पाटील, सेजल गालींदे या तीनही खेळाडू महाराष्ट्राच्या संघात होत्या. महाराष्ट्राच्या या संघासाठी प्रा. आरती चौधरी, मंथन पवार यांनी प्रशिक्षक म्हणून तसेच आकाश थोरात यांनी व्यवस्थापक काम पाहिले. असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्राच्या वतीने अध्यक्ष संतोष चौधरी व उपाध्यक्ष अभिनेत्री अश्विनी महांगडे आणि सचिव प्रा. आरती चौधरी यांनी संघातील सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र शासन आणि क्रीडा युवक सेवा संचालन यांनी खेळाडूंसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्याबद्दल महाराष्ट्राच्या गतका खेळाडूंचे खेलो इंडिया स्पर्धेमध्ये रुपेरी यश आभार व्यक्त केले.

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

गर्भवती महिलेला उपचार नाकारत खासगी रुग्णालयात पाठवले

■ केडीएमसी रुक्मिणीबाई रुग्णालयाचा आणखी एक प्रताप

■ गरीब कुटुंबाला ५० हजार रुपयांचा भुर्दंड

रुग्णवाहिका न मिळाल्याने एका महिलेचा रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या दारातच मृत्यू झाला होता. रुग्णालय प्रशासनाच्या बेफिकिरीची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्तांनी सहा कर्मचाऱ्यांना निलंबित केले. या घटनेला २४ तास उलटत नाहीत तोवर रुक्मिणीबाई रुग्णालय प्रशासनाचा आणखी एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. गर्भवती महिलेला उपचार नाकारत खासगी रुग्णालयात पाठविण्यात आले. यामुळे गरीब कुटुंबाला ५० हजार रुपयांचा उपचाराचा भुर्दंड सहन करावा लागला.

महापालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस आणि कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या निष्काळजीपणाबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी संताप व्यक्त केला. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडे साळवी यांनी तक्रार केली आहे. सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि गरीब शाहू कुटुंबाला आर्थिक सहकार्य करण्याची त्यांनी मागणी केली आहे.

घरकाम करून उदरनिर्वाह करणाऱ्या योगिता शाहू असे गर्भवती महिलेचे नाव आहे. रुक्मिणीबाई रुग्णालयात योगिता यांची नियमित तपासणी सुरू होती. ६ मे २०२५ रोजी सोनोग्राफी केल्यानंतर डॉक्टरांनी ७ मे रोजी सकाळी ११ वाजता ॲडमिट होण्यास सांगितले होते. मात्र तेथे पोहोचल्यावर त्यांना ॲडमिट करून न घेता सायन रुग्णालय अथवा खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला गेला. प्रसूती वेदना असह्य असल्याने तातडीने मुंबई गाठणे शक्य नव्हते. त्यामुळे शाहू कुटुंबीयांनी कर्ज काढून कल्याण येथील एका खासगी रुग्णालयात योगिता यांना दाखल केले. मात्र त्यांचे बिल ४० ते ५० हजार रुपये आले आहे. त्यामुळे पालिकेच्या या कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे. तर याबाबत महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ला यांच्याशी संपर्क साधला असता, संपर्क होऊ शकला नाही.

रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न अखेर मार्गी

कल्याण : कल्याण पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीच्या मागणी नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान रस्ता रुंदीकरण प्रकरणात आमदार विश्वनाथ भोईर यांच्या मध्यस्तीने आयुक्त अभिनव गोयल यांनी समितीच्या मागण्या मान्य करून रस्त्याचा विषय मार्गी लावला आहे. १९९२ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा रस्ता रुंदीकरण करण्यासाठी घेण्यात आलेली होती. त्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीने तीव्र आंदोलन उभे केले होते. आणि उद्यानाची जागा वाढवून द्यावी अशी मागणी सतत लावून धरली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा बाधित होत असून रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. या संदर्भातील तिढा सुटता सुटत नव्हता आणि स्मार्ट सिटीला रस्ता रुंदीकरण करता अडचण निर्माण होत होती. उद्यानाला इतिहासिक पार्श्वभूमी आहे. उद्यान वाढवणे आवश्यक आहे. या बाबत सर्वं आयुक्तानी सहकार्य करण्याची भूमिका घेतलेली होती. तीच भूमिका आयुक्त अभिनव गोयल यांनी कायम ठेवावी व लवादाचा निर्णय लागताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा वाढवून द्यावी, असा मुद्दा स्थानिक आमदार विश्वनाथ भोईर यांनी मांडला.

केडीएमसीची अनधिकृत बॅनर, पोस्टरवर धडक कारवाई

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली परिक्षेत्रात दुर्घटना टाळण्याच्या दृष्टिकोनातून अनधिकृत होर्डिंग हटविण्याचे निर्देश कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन बैठकीत दिले होते. त्या आनुषंगाने

कल्याण-डोंबिवली महापालिका ड प्रभागक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या जाहिरात बॅनर, पोस्टरवर ड प्रभागाचे सहा आयुक्त उमेश यमगर यांच्या पथकाने कठोर कारवाई केली.

ड प्रभागातील काही शिक्षण संस्था व क्लासेसमार्फत महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ड प्रभाग क्षेत्रात विविध ठिकाणी जाहिरात बॅनर आणि पोस्टर लावण्यात आले होते. त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण झाले असून नागरी सौंदर्यावर परिणाम झाला होता. ड प्रभागाच्या पथकामार्फत संबंधित बॅनर, पोस्टर्स तत्काळ हटविण्यात आले आणि संबंधित ५ जाहिरातदारांविरुद्ध कोळशेवाडी पोलीस ठाण्यात कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

डोंबिवलीच्या फ प्रभागातही सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या पथकाने डोंबिवली पूर्व येथील कल्याण रोडवरील दोन होर्डिंग, खंबाळपाळा रस्त्यावरील दोन होर्डिंग, कांचनगाव भोईरवाडी येथील एक होर्डिंग अशा पाच होर्डिंग वर निष्कासनाची कारवाई काल दिवसभरात केली. सद्यस्थितीत अवकाळी हवामानामुळे, पत्र्याचे किंवा वाऱ्याला अडथळा ठरणारे फलक लक्षात घेता धोकादायक, अनधिकृत व परवानगी संपुष्टात आलेले होर्डिंग्स, बॅनर्स संबंधितांनी स्वतःहून हटवावेत. सार्वजनिक ठिकाणी कोणतीही जाहिरात करण्यापूर्वी महापालिकेची परवानगी घेणे अनिवार्य आहे. अन्यथा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि विद्रूपतेच्या विळख्याबाहेर ठेवण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

वि. सा. सामान्य रुग्णालयात 'हिरकणी कक्षाचे' उद्घाटन !

ठाणे : घरातील स्त्री ही गर्भगृहासारखी असते आणि तिची सुरक्षितता म्हणजेच खऱ्या अर्थाने समाजाची सुरक्षा. या विचारातून स्तनदा मातांसाठी सुसज्ज 'हिरकणी कक्ष' ठाण्यातील वि. सा. सामान्य रुग्णालयात उभारण्यात आला आहे. या कक्षाचे उद्घाटन अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धिरज महंगाडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या उपक्रमासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, हिमालय कंपनीच्या सहकार्याने हा 'बेबी केअर पॉड' साकारण्यात आला आहे. स्तनदा मातांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा या कक्षामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उद्घाटनप्रसंगी डॉ. धीरज महांगडे यांनी मातांनी बाळांची घ्यायची सुरक्षा या बाबत मार्गदर्शन केले. या उद्घाटन प्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राहूड, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शोभना चव्हाण, अधिसेविका प्रतिभा बर्डे, तसेच पाठ्यनिर्देशिका प्राजक्ता मोकल यांनी उपस्थितांना विषयानुरूप मार्गदर्शन करून जनजागृती केली.

अंबरनाथमध्ये वीज ग्राहकांच्या ३० तक्रारींचे निवारण

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने अंबरनाथमध्ये वीज ग्राहकांच्या समस्यांसाठी आयोजित शिबीरात ३० तक्रारींचे निवारण करण्यात आले. महावितरणच्या अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम उपविभागातील ग्राहकांसाठी शुक्रवारी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

२८ एप्रिल ते १२ मे दरम्यान सेवा हक्क पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरवड्यात वीज ग्राहकांच्या प्रलंबित असलेल्या विशेषतः नवीन वीजजोडणी व ग्राहकांच्या वीज बिलावरील नावात बदल तसचे विविध प्रकारच्या तक्रारींचे निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार अंबरनाथमध्ये ग्राहकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शुक्रवारी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात नवीन वीजजोडणीचे १०, वीज बिलावरील नावात बदल करण्याबाबतचे ८ आणि वीज बिलासंदर्भातील १२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा व उल्हासनगर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण चकोले यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित करण्यात आले. अंबरनाथ पूर्व व पश्चिम उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अनुक्रमे जितेंद्र प्रजापती आणि अलका कावळे यांच्या नेतृत्वाखाली अभियंते, कर्मचाऱ्यांनी हे शिबीर यशस्वी केले.

ठाणे रेल्वे स्थानकातील विकासकामे पावसाळ्यापूर्वी युद्धपातळीवर पूर्ण करा

पाहणी दौऱ्यात खासदार नरेश म्हस्के यांच्या रेल्वे अधिकाऱ्यांना सूचना

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

ठाणे रेल्वे स्थानकाचा नुतनीकरणाच्या माध्यमातून कायापालट होत आहे. फलाटांवर नव्याने छतांची उभारणी, पंखे, वाढीव आरक्षण खिडक्या, वातानुकूलीत प्रतीक्षा कक्ष उभारण्यात येत आहे. नियमित स्वच्छतेवर भर द्या, युद्धजन्य परिस्थितीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दक्ष रहा, पावसाळ्यापूर्वी सर्व विकासकामे तातडीने पूर्ण करा, अशा महत्त्वपूर्ण सूचना शुक्रवारी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना केल्या.

ठाणे रेल्वे स्थानकात सुरु असलेल्या विकासकामांचा आढवा तसेच प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत पाहणी दौरा केला. या दौऱ्यानंतर बैठक घेण्यात आली. गेल्या वर्षभरापासून वेळोवेळी केलेल्या सूचनांची योग्य अमंलबजावणी रेल्वे अधिकाऱ्यांनी केली आहे. आज प्रत्यक्षात सर्व बदल दिसत असून विकासकामांबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी समाधान व्यक्त करत अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज ८ लाख प्रवासी प्रवास करत आहेत. रेल्वे प्रवाशांच्या समस्या, विकासकामे, प्रस्तावित कामांबाबत मी निवडून आल्यापासून डीआरएम, डीएम यांच्याशी सातत्याने माझा पाठपुरावा सुरु आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकाही झाल्या आहेत. आता नव्याने वातानुकूलीत प्रतीक्षा कक्ष उभारला जात असून येत्या जुलै महिन्यात त्याचे लोकर्पण अपेक्षित आहे. ८ एक्सिलेटर्स प्रवाशांच्या सेवेत असून २ एक्सिलेटर्स लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी माध्यमांना दिली.

कायदेशीर अडचणींमुळे काम खोळंबले

ठाणे रेल्वे स्थानकातील फलाटांवरील नव्याने छताचे पत्रे बदलण्याचे काम वेगाने सुरू आहे. एका रेल्वे पादचारी पुलाचे काम सुरू असून लवकरच ते मार्गी लागणार आहे. उन्हाळ्याची सुट्टी पडली असून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी जाणार असल्याने तातडीने दोन वाढीव आरक्षण खिडक्या सुरू करण्यात येणार आहेत. स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करणे, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलीस सज्ज असल्याची माहिती खासदार म्हस्के यांनी दिली.

नागरी सेवा अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने प्रशासनाचे सकारात्मक पाऊल

'टेक-वारी'तील ज्ञानाचा महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना ऑनलाइन लाभ

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे 'टेक-वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा अभिनव उपक्रम दि. ५ ते ९ मे २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या माध्यमातून शासनातील अधिकारी, कर्मचारी यांनी स्वयंविकास घडवित विविध नागरी सेवा अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने माहितीपूर्ण मार्गदर्शनाचा लाभ विविध क्षेत्रातील

तज्ज्ञांमार्फत करून देण्यात येत आहे.

सद्यःस्थितीत तंत्रज्ञानात आणि भवतालच्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत असल्याने प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांना अद्ययावत बनविण्यासाठी प्रशिक्षण दिले जावे व यामधून प्रशासकीय कामकाजात अचूकता व गतिमानता आणली जावी तसेच काम करत असताना येणाऱ्या ताणतणावाचे व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन मिळावे या दृष्टीने हा अभिनव उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे.

या आनुषंगाने नवी मुंबई महापालिकेच्या अधिकारी / कर्मचारी वृंदानेही 'टेक-वारी' या आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असलेल्या कार्यशाळेचा लाभ घ्यावा यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील विशेष समिती सभागृहात टेक वारीच्या ऑनलाईन व्याख्यान सत्राची थेट प्रक्षेपण व्यवस्था करण्यात आलेली आहे. याकरिता महापालिका प्रशासन विभागाने पाच दिवसात दिवसभर संपन्न होणाऱ्या उपक्रमातील व्याख्याने नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांनी अनुभवण्याचे नियोजन केले असून प्रत्येक विभागाला व्याख्याने बघण्याच्या वेळा निश्चित करून दिलेल्या आहेत.

त्यानुसार दररोज संबधित विभागातील अधिकारी, कर्मचारी या विविध उपयोगी विषयांवरील व्याख्यानांतील ज्ञानसंपदेचा लाभ घेत आहेत.

टेक-वारी ऑनलाइन अनुभवण्यासाठी कर्मचारी उत्साही

आधुनिक तंत्रज्ञान हे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सहज-सोपे आणि समजण्याजोगे बनविणे, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स अशा महत्त्वाच्या क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाद्वारे हे जटिल विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हा 'टेक-वारी'चा गाभा असून प्रशासकीय सक्षमीकरण, सेवा प्रदानात सुलभता व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याविषयी कार्यशाळेमध्ये त्या त्या क्षेत्रातील नामवंत व्याख्याते मार्गदर्शन करीत आहेत. 'टेक-वारी' मधील या मार्गदर्शनाचा लाभ नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांनीही घ्यावा व याचा उपयोग आपल्या कामकाजात करावा यादृष्टीने टेक-वारी ऑनलाइन अनुभवण्याचा हा उपक्रम राबविला जात असून त्याला उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

तांत्रिक बिघाडामुळे ठाणे-बेलापूर रस्त्यावरील वाहतूक ठप्प

◆ **ठाणे (वार्ताहर) :**

ठाणे-तुर्भे ट्रान्स हार्बर मार्गावर तांत्रिक बिघाडामुळे रेल्वेसेवा ठप्प झाली होती. ठाणे-तुर्भे रेल्वे स्थानकावर प्रवाशांनी प्रचंड गर्दी केल्याने त्याचा फटका ठाणे-बेलापूर रस्त्यावरून जाणाऱ्या वाहतुकीला बसल्याने ठाणे बेलापूर रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या.

ठाणे बेलापूर रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना कळवा खाडी पुलावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. कळवा नाका ते कळवा खाडीपूल व विटावा या ठिकाणी बेलापूरकडे जाणाऱ्या व ठाण्यात येणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडीमुळे हजारो वाहने



जागीच अडकून पडल्याने कळवा नाक्यावरून साकेतपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. त्यातच घोडबंदर रस्त्यावरील काम सुरू असल्याने अवजड वाहने त्या रस्त्यावरील वाहने माजिवडा मार्गे साकेतहून कळवा मार्गे येत असल्याने सकाळीच वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांसह कामानिमित्ताने घराबाहेर पडलेल्या नागरिकांना या वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले.

पाकिस्तान विनाशाकडे ...

पाकिस्तानचे राज्यकर्ते, लष्कर प्रमुख आणि कट्टरतावादी नेते पाकिस्तानला विनाशाच्या मार्गावर नेत आहेत. भारतात दहशतवाद्यांना पाठवून हिंसाचार आणि रक्तपात घडवायचा, लष्करी दलाच्या तळांवर हल्ले करायचे, निरपराध भारतीयांचे बळी घ्यायचे ही मालिका वर्षानुवर्षे चालूच आहे. उरी, पठाणकोट, पुलवामा, पहलगाम अशा हत्याकांडानंतर देशभरात संतापाची लाट उसळली.

दहशतवाद्यांना पाठिंबा आणि संरक्षण देणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवा, अशी मागणी सर्वस्तरातून सुरू झाली. आता खूप झाले, आता यापुढे पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही अशीच भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात प्रबळ होत गेली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असिम मुनीर यांची प्रक्षोभक व भडकाऊ भाषणे ही दहशतवादाला उत्तजेन देणारी होती. भारताच्या विरोधात गरळ ओकणारी होती. एका देशाचा लष्कर प्रमुख शेजारी राष्ट्राच्या विरोधात भडकाऊ भाषणे कशी करू शकतो ? असिम मुनीर यांची प्रतिमाच जिहादी जनरल अशी आहे. पहलगाम येथे निरपराध हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून दहशतवाद्यांनी पॉईंट ब्लँक गोळ्या घालून त्यांची हत्या केली. महिलांच्या पतीला त्यांच्या डोळ्यांदेखत समोरून गोळ्या घालून त्यांचे कुंकू पुसले. भारतीय संस्कृतीत कुंकू हे अतिशय पवित्र मानले जाते. ते सन्मानाचे व विश्वासाचे प्रतीक आहे. त्या महिलांचा आक्रोश व अश्रू सर्व देशाने बघितले. दहशतवाद्यांना पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण आणि एके ४७ सारख्या स्वयंचलित बंदुका देऊन हिंसाचार घडविण्यासाठी भारतात पाठवले जाते याचे सज्जड पुरावे भारताने जगाला दाखवले आहेत. जा मोदींना जाऊन सांग, असे दहशतवाद्याने पहलगाममधील महिलांना बजावले हा त्यांच्या क्रूरतेचे कळस होता. त्याचा बदला घेण्यासाठीच भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. सात शहरातील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. त्यानंतरही पाकिस्तानी सैन्याने सरहद्दीलगत भारताच्या हद्दीतील पंजाब व काश्मीरमधील वस्त्यांवर गोळीबार केला व त्यात निरापराध लोकांचे बळी घेतले. भारताने गुरुवारी रात्री लाहोर, कराची, इस्लामाबाद, फैसलाबाद, पेशावर, रावळपिंडी अशा सर्व महत्त्वांच्या शहरांवर हवाई हल्ले चढवले. भारताने ड्रोन व क्षेपणास्त्रांचा पाकिस्तानी लष्करी तळांवर मारा केला. लाहोरपासून इस्लामाबादपर्यंत पाकिस्तानात ब्लॅक आऊट जारी करण्यात आला. इस्लामच्या नावावर दहशतवादी कारवाया घडविणाऱ्या पाकिस्तानला भारतीय हल्ल्यांपासून स्वतःला वाचविण्यासाठी रात्री अंधारात राहावे लागले. भारत-पाकिस्तान दरम्यान अघोषित युद्ध सुरू झाले. भारताने पाकिस्तानची पाच लढाऊ विमाने पाडली. कराची बंदराच्या दिशेने भारताच्या विक्रांत युद्ध नौकेने कूच केले आहे. चीन व तुर्की वगळता जगातील कोणत्याही देशाने पाकिस्तानला पाठिंबा दिलेला नाही. भारतावर झालेले दहशतवादी हल्ले आणि विशेषतः पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी धर्म विचारून केलेली २६ हिंदू पर्यटकांची हत्या याने देशातील जनतेचा थरकाप तर झालाच पण पाकिस्तानवर हल्ला करून कठोर बदला घ्यावा अशी जनता मागणी करू लागली. जे जनतेला पाहिजे आहे तेच मोदींनी करून दाखवत आहेत. ऑपरेशन सिंदूर सुरू होताच सारा देश मोदींच्या नेतृत्वाचा जयजयकार करू लागला. मोदींच्या अभिनंदनाचे फलक सर्व देशभर झळकू लागले. पाकिस्तानकडून होणारी घुसखोरी भारतीय सैन्याने रोखलीच पण पाकिस्तानचे साठ हून अधिक ड्रोन नेस्तनाबूत करून हल्ले परतवून लावले.

दि. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांचे हत्याकांड केले. तब्बल पंधरा दिवसांनी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. भारतीय सैन्य दलाने ज्या सुनियोजित पद्धतीने पाकिस्तानवर ड्रोन व क्षेपणास्त्रांचे हल्ले चढवले, त्यात पाकिस्तानचे नेते व प्रशासनाची पळापळ झालेली दिसते. भारताकडे सैन्य बळ, शस्त्र बळ पाकिस्तानच्या कितीतरी पटीने जास्त आहे. भारतीय सैन्याकडे शिस्तबद्ध, त्यागी भावना तसेच देशासाठी निष्ठेने काम करणारी फौज आहे. भारताची आर्थिक स्थिती पाकिस्तानच्या तुलनने कितीतरी सक्षम व स्थिर आहे. पाकिस्तानने दहशतवादी कारवायातून भारताला डिवचण्याचे काम केले आहे. नरेंद्र मोदींसारखा कठोर व सक्षम पंतप्रधान देशात असताना पाकिस्तानने मोदींनाच आव्हान देऊन स्वतःच स्वतःसाठीचा खड्डा खणला आहे. पाकिस्तानात शाहबाज शरीफ यांचे सरकार असले तरी त्यावर लष्कराचा रिमोट आहे. लष्कराच्या नियंत्रणामुळे तिथे सरकारला फार काही अधिकार नाहीत. सेना जे सांगते तेच पाकिस्तानात घडत असते. तिथे सरकारला स्वातंत्र्य नाही. लष्कर प्रमुखच जर जिहादी असतील तर सारे सरकार त्यांच्यामागे फरफटत जाताना दिसते. भारतीय सैन्य दलाने इस्लामाबादसह पाकिस्तानातील प्रमुख शहरांवर हवाई हल्ले केले तेव्हा लष्कर प्रमुख असिम मुनीर हे कुठे आहेत असे प्रश्न विचारले गेले. नंतर ते बंकरमधे जाऊन लपले असल्याच्या बातम्या झळकल्या. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या निवासस्थापासून अवघ्या वीस किमी. अंतरावर मोठे बॉम्बस्फोट झाले. देशाचा पंतप्रधान व लष्कर प्रमुख हे जर सुरक्षित नसतील, तर देशातील जनतेचे रक्षण तरी करणार कोण? पाकिस्तान त्याच्या कर्माची फळे भोगत आहे. जशी करणी तशी भरणी. अगोदरच हा देश आर्थिकदृष्ट्या डबघाईला आला आहे. जिहादी आणि दहशतवादी यांतच सारा देश गुरफटला आहे. भिकेचा कटोरा घेऊनच पाकिस्तान जगापुढे उभा आहे. चीनने दिलेली शस्त्रे भारताशी लढताना कुचकामी ठरली याने चीनचीही नाचक्की होत आहे. पाकिस्तानमधील अनेक शहरातील संरक्षण प्रणाली भारतीय हवाई दलाने उद्ध्वस्त केल्याने कोणते विमान कुठून येणार याची माहिती मिळणेही तेथे बंद झाले आहे. पहलगामचा दहशतवादी हल्ला व निर्घृण हत्याकांडाला पाकिस्तानच जबाबदार आहे. त्याची शिक्षा पाकिस्ताननेच भोगलीच पाहिजे. पाकिस्तान भारताबरोबर एक हरणारी लढाई लढत आहे. पाकिस्तानची वाटचाल विनाशाकडे चालू आहे.

जाके मोदी से कह दो ? लो, कह दिया !

अनिल आठल्ये
निवृत्त कर्नल, अभ्यासक

पाकिस्तानची गाठ पंतप्रधान मोदींशी आहे. त्यांनी कारकिर्दीच्या सुरुवातीलाच पाकिस्तानबरोबर शांतता निर्माण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण त्यांची सकारात्मक प्रतिसाद न देणारी तिरकी चाल कायम राहिली. पंतप्रधान मोदी परत पाकिस्तानच्या भूलथापांना बळी पडतील अशी शक्यता आता दिसत नाही. त्यामुळे युद्ध संपले तरी पाकिस्तानवर आर्थिक आणि अन्य दबाब कायम ठेवले जाण्याची दाट शक्यता आहे.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत-पाकिस्तान दरम्यान कधीच शांतता नांदली नाही. स्वातंत्र्यानंतर महिन्याभरातच पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या आडून काश्मीरवर आक्रमण केले आणि पहिल्या भारत-पाक युद्धाची सुरुवात झाली. त्यानंतर १९६५, १९७१ आणि १९९९ मध्ये दोन्ही देशांमध्ये उघड युद्धे झाली. परंतु मधल्या काळात शांतता होती असे मुळीच नाही. विशेषतः १९८०-१९९० च्या दशकांमध्ये पाकिस्तानकडून भारतात फार मोठ्या प्रमाणात दहशतवादी हल्ले घडवून आणले गेले. यातून भारतातील एकही मोठे शहर वाचले नाही. देशात अनेक बॉम्बस्फोट झाले. दिल्ली, जयपूर, मुंबई, वाराणसी, कोईमतूर, अहमदाबाद अशा अनेक शहरांमध्ये बॉम्बस्फोटांमध्ये काही हजार लोक तरी मारले गेले असतील. काश्मीर प्रश्न सोडवला न गेल्यामुळे दोन देशांमध्ये तणाव असल्याचे सुरुवातीपासूनच काही पाकिस्तानी आणि त्यांचे भारतातील समर्थक म्हणत राहिले. पण मुंबईवरील २६ नोव्हेंबरचा हल्ला असो वा पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये झालेला बॉम्बस्फोट असो, याचा काश्मीरशी काहीही संबंध नाही. १९८० च्या दशकात झिया उल हक यांच्या काळात पाकिस्तानात इस्लामीकरण केले गेले आणि कडव्या इस्लामला पाकिस्तानचे मुख्य धोरण बनवले गेले. या कडव्या इस्लामच्या मते, प्रेषित मोहंमदांनीच 'जे लोक भारतावर हल्ला करून त्याला इस्लामी देशात परिवर्तीत करेल ते सरळ स्वर्गात जातील' असे म्हटल्याचे सांगितले जाते. यालाच 'गझवा ए हद' असे म्हणतात. गेली ७० वर्षे पाकिस्तानची वाटचाल याच दिशेने सुरू आहे.

या सर्व कट्टर इस्लामवादाचा परिणाम म्हणूनच २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला करण्याची घटना घडली. २०१४ नंतर सत्तेत आलेल्या मोदी सरकारने हा पाकिस्तानी डाव ओळखला आणि आता अशा प्रकारच्या हल्ल्यांसाठी आपण पाकिस्तानलाच जबाबदार धरणार असल्याचे जाहीर केले. १९८० च्या दशकापासून पाकिस्तान अण्वस्त्रयुद्धाचा बागुलबुवा उभा करुन भारताकडून प्रत्युत्तरादाखल होणाऱ्या कारवाईला खीळ घालत आला आहे. त्यामुळे सर्वप्रथम भारत-पाकिस्तान संदर्भात अण्वस्त्रांचे समीकरण काय आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. अणुयुद्धाबद्दल काही शाश्वत नियम आहेत. ते म्हणजे अण्वस्त्रे इतर शस्त्रांपेक्षा अतिशय वेगळी आहेत. त्यामुळे जगात कुठेही अणुयुद्ध झाले तर जगभर किरणोत्सर्ग पसरून गंभीर परिणाम होण्याची भीती आहे. या भीतीमुळे जागतिक स्तरावर अण्वस्त्रांचा वापर करायचा नाही तसेच केवळ देशाचे अस्तित्व धोक्यात आले तरच ती वापरायची, अशा प्रकारची धोरणे अवलंबली गेली. त्यामुळे अण्वस्त्रसज्ज देशांमध्ये युद्ध झाले तरी ते कधीच निर्णायक होऊ शकत नाही, कारण हरणारा देश अण्वस्त्रवापराची धमकी देऊन आक्रमण थांबवू शकतो. याचबरोबर अण्वस्त्रांविरुद्ध बचावाची काहीच साधने नसणे, हेदेखील वास्तव आहे.

कोणत्याही देशाच्या अण्वस्त्रसज्जतेत तीन मुद्दे महत्त्वाचे असतात. त्यात अणुबॉम्ब आणि ते वाहून नेणारी क्षेपणास्त्रे वा विमाने असणे तसेच एखाद्या राष्ट्राची राजकीय इच्छाशक्ती हे पैलू महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. केवळ अणुबॉम्बचा विचार केल्यास भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडे प्रत्येकी जवळपास १७० च्या आसपास अणुबॉम्ब आहेत; परंतु पाकिस्तानची अण्वस्त्रे पहिल्यापासूनच परिष्कृत युरेनियमपासून बनवली आहेत. ती आकाराने मोठी आणि एक ते दीड टन वजनाची आहेत. अशी मोठी अण्वस्त्रे क्षेपणास्त्रावर बसवण्यास लागणारे तंत्रज्ञान पाकिस्तानकडे आहे का, याबद्दल दाट शंका आहे. त्यामुळे पाकिस्तान आपली क्षेपणास्त्रे दाखवत असला तरी प्रत्यक्षात अणुबाँब टाकण्यासाठी तो विमानांवरच अवलंबून आहे. क्षेपणास्त्रांविरुद्ध बचावाची प्रणाली निर्माण करणे अत्यंत कठीण आहे. अगदी इस्त्रायलसारख्या देशावरही हमास, सीरिया आणि इराणने क्षेपणास्त्राचा मारा केलेला आहे; परंतु अण्वस्त्र घेऊन जाणारे विमाने थांबवणे वा पाडणे तुलनात्मकदृष्ट्या सोपे आहे. मुख्य म्हणजे पाकिस्तानकडे भारताइतकीच अण्वस्त्रे असली तरी ती लक्ष्यावर पोहोचण्याआधी हवेतच उडवून देण्याची क्षमता भारताकडे आहे.

पाकिस्तान आपली क्षेपणास्त्रे अण्वस्त्रसज्ज असल्याचे म्हणतो तेव्हा खोटे बोलत असतो. इतिहास तपासून पाहिला असता अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. उदाहरणार्थ १९७१ च्या युद्धात भारताने कराचीवर हल्ला करुन तेथील पेट्रोलच्या साठ्याला आग लावली होती. तेव्हा पाकिस्तानने ती छायाचित्रे मुंबईची आहेत, असे जगाला सांगितले होते. बांगलादेशात शरणागती पत्करण्याच्या दिवसापर्यंत पाकिस्तान आपण युद्ध जकत आहे, असेच जनतेला सांगत होते. त्यामुळे पाकिस्तान याही बाबतीत खोटे बोलत आहे, हे नक्की. पाकिस्तानकडे योग्य तंत्रज्ञान असते तर आत्तापर्यंत भारताप्रमाणे पाकिस्ताननेही आपल्या क्षेपणास्त्राद्वारे अंतरिक्षात ग्रह सोडले असते. आजपर्यंत पाकिस्तानने आपल्या रॉकेटद्वारे उपग्रहाचे प्रक्षेपण केलेले नाही. याउलट, भारताकडे असलेली 'अग्नी'सारखी क्षेपणास्त्रे पाणबुड्यांवरही लावली आहेत. पाकिस्तान ती नष्ट करु शकत नाही. त्यामुळे अगदी पाकिस्तानने प्रथम अण्वस्त्रे वापरुन हल्ला केला तरीही क्षेपणास्त्राद्वारे प्रतिहल्ला करत पाकिस्तानला पूर्ण बेचिराख करण्याची क्षमता भारताकडे आहे. दोन्ही देशांमधील अण्वस्त्रांच्या संदर्भात हा असमतोल समजून घेण्याची गरज आहे. याची जाण असल्यामुळेच पाकिस्तानसाठी अण्वस्त्रांचा वापर म्हणजे आत्मघाती हल्ला होय.

या सर्व पार्श्वभूमीवर सध्या भारत-पाकिस्तानदरम्यान एकमेकांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरुन हल्ले केले जात आहेत. मात्र आत्तापर्यंत कोणत्याही देशाने उन्नत प्रतीची क्षेपणास्त्रे एकमेकांविरुद्ध वापरलेली नाहीत. त्यामुळे हे क्षेपणास्त्रांचे युद्ध कवा ड्रोनचा वापर फार काळ चालू शकत नाही. या युद्धामध्ये भारताकडे स्वदेशी बनावटीची विमानभेदी क्षेपणास्त्रे 'आकाश' आणि रशियाकडून घेतलेली 'एस ४००' ही प्रणाली पाकिस्तानच्या विमानभेदी प्रणालींपेक्षा अनेक पटींनी परिणामकारक आहे. परिणामस्वरुप भारताचे ड्रोन पाकिस्तानात गेले आणि त्यांनी निशाण्यांवर हल्ले केले. मात्र प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने पाठवलेल्या क्षेपणास्त्रे खूप मोठ्या प्रमाणात निकामी करण्यात आपण यशस्वी झालो. त्यातच भारताने कराची बंदराची नाकेबंदी केली. त्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था (जी आधीच डबघाईला आली आहे) आणखीच मरणपंथाला लागण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे आर्थिक आणि सामरिक या दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानवर जबरदस्त दबाव आहे.

भूतकाळाचा विचार केला तर ही 'गझवा ए हद' ची घोषणा काही नवी नव्हे. १९४७ मध्ये काश्मीरमध्ये पाकिस्तानी टोळीवाल्यांनी आपल्या गाड्यांवर 'चलो दिल्ली' असे लिहिले होते. अगदी १९७० च्या दशकापर्यंत पाकिस्तानमध्ये एक घोषणा नेहमी दिली जायची, ती म्हणजे 'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हदुस्तान'. सर्वसामान्य पाकिस्तान्याला एक पाकिस्तानी दहा हदूंच्या बरोबरचा आहे, असे खरोखरच वाटायचे. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानी सैन्याचे अनेक रणगाडे पकडले गेले. त्यात मिळालेल्या गुप्त दस्तावेजामध्ये पाकिस्तानची तेव्हादेखील दिल्लीपर्यंत जाण्याची योजना असल्याचे दिसून आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तानदरम्यान जेव्हा जेव्हा युद्ध झाले आणि त्यात त्यांचा पराजय झाला, तेव्हा तेव्हा पाकिस्तानमध्ये सत्ताबद्दल झाल्याचे दिसले आहे. १९६५ च्या युद्धात काश्मीर घेण्यात अपयश आल्यानंतर अयुब खान यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले. १९७१ च्या युद्धानंतर जनरल खान यांचा तक्तापलट झाला. १९९९ मध्ये कारगीलमधील युद्ध हरल्यानंतर नवाज शरीफ यांना हटवण्यात आले. आजपर्यंतची ही परंपरा बघितली तर येत्या काही दिवसांमध्ये आपली कातडी वाचवण्यासाठी पाकिस्तानमध्ये सत्ताबदल होण्याची दाट शक्यता दिसून येते. सध्याचे नामधारी पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सैन्याचे प्रमुख (पाकिस्तानचे खरे राजकर्ते) जनरल आसीफ मुनिर या दोघांची उचलबांगडी केली जाऊन इम्रान खान सत्तेत येण्याची दाट शक्यता आहे. भुत्तोंनी १९७२ मध्ये आणि जनरल मुशर्रफ यांनी २००२ मध्ये भारताशी शांततेसाठी बोलणी सुरू केली, त्याप्रमाणेच चर्चेचे गुऱ्हाळ पुन्हा सुरू होण्याची दाट शक्यता आहे.

परंतु यावेळी पाकिस्तानची गाठ पंतप्रधान मोदींशी आहे. त्यांनी कारकिर्दीच्या सुरुवातीलाच पाकिस्तानबरोबर शांतता निर्माण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण त्याचा काहीही परिणाम न होता पाकिस्तानची तिरकी चाल सुरूच राहिली. पंतप्रधान मोदी परत पाकिस्तान्याच्या भूलथापांना बळी पडतील अशी शक्यता दिसत नाही. त्यामुळे युद्ध संपले तरी पाकिस्तानवर आर्थिक दबाव आणि पाणीबाणी कायम ठेवली जाईल, अशीच दाट शक्यता आहे.

बिरदेव डोणे यांची उत्तुंग भरारी

रवींद्र तांबे

मेंढ्यांना माळरानात चरायला घेऊन जाणारा व मेंढ्या चरत असताना त्यांच्यावर लक्ष ठेवत अभ्यास करणारा बिरदेव डोणे यांनी सन २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाची (युपीएससी) परीक्षा दिली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवार दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी लागला. यात बिरदेव डोणे यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. आता बिरदेव डोणे हा आयपीएस अधिकारी झाला आहे. यासाठी त्यांनी मेंढ्यांना सांभाळत केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अभ्यास जिद्दीने, मेहनतीने आणि आत्मविश्वासाने केल्यामुळे त्याच्या आयुष्याला दिशा देणारी ही कहाणी आपल्या राज्यातील तमाम तरुणाईसाठी प्रेरणा देणारी आहे.

कोणतीही गोष्ट करीत असताना मनाची तयारी असावी लागते. तरच आपल्या मनात जिद्द निर्माण होते. त्यात आधी अपयश तर कधी यश, कधी अपमान तर कधी कौतुक होत असते. अशा परिस्थितीला समर्थपणे तोंड द्यायचे असते, तरच आपण उंच भरारी घेऊ शकतो. यासाठी सातत्य असावे लागते. हीच बाब बिरदेव डोणे यांनी केली. घर छोटे, त्यात मेंढ्यांचा वावर, त्यामुळे अभ्यासासाठी पुरेशी जागा नसल्यामुळे घराच्या व्हरांड्यात व माळरानात मेंढ्या चरताना अभ्यास करायचा. म्हणजे "ना घर ना लाईट" अशी परिस्थिती. पुरेशा मूलभूत सुविधा नसताना आणि घरची आर्थिक परिस्थिती बिकट असताना सुध्दा त्यांनी आपले ध्येय सोडले नाही. त्यावर मात करत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात उत्तुंग भरारी घेतली आहे.

आता त्याचे कौतुक सर्व स्तरातून करण्यात येत आहे. सध्या त्याचे सत्कार सुद्धा होऊ लागले आहेत. तेव्हा आजच्या तरुण पिढीनी त्यांनी जे अभूतपूर्व यश संपादन केले त्याचा आदर्श घेऊन आपण सुद्धा अशाच प्रकारे यश संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी आपल्याला त्या क्षेत्रातील आवड असावी लागेल. नियमित अभ्यास तरच यश आपल्या जवळ येते. त्याच बरोबर आपल्या जीवनात चांगल्या मित्रांची सोबत असणे गरजेचे असते. बिरदेव डोणे यांनी सुद्धा चांगल्या मित्रांची संगत केली.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यामधील यमगे या छोट्याशा गावातील मेंढपाळ कुटुंबातील बिरदेव बलव्वा सिद्धप्पा डोणे यांने इतिहास घडविला. वडिलांचे शिक्षण बारावीपर्यंत झालेले तर आई निरक्षर होती. आपला मुलगा मोठा साहेब व्हावा या जिद्दीने त्यांनी त्याला शिक्षण दिले. त्याचे कुटुंब मेंढ्या पाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असत. त्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती बेताची नसताना सुद्धा वडिलांसोबत मेंढ्यांची राखण करीत सन २०२४ च्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात ५५१ वी रँक मिळवत त्यांनी उज्ज्वल यश संपादन केले. ही गोड बातमी बिरदेव कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यामधील जोडकुर्ली या बहिणीच्या गावी त्यांच्या काकांच्या मेंढ्या माळरानात चरवत असताना २२ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी अडीच वाजता त्याला मित्राचा फोन आला आणि आपण केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा पास झाल्याची बातमी समजली. यासाठी त्यांनी पोस्टातील सरकारी नोकरीचा राजीनामा दिला होता. त्याच्या मोठ्या भावाने सुद्धा त्याला सैन्यात जाण्यासाठी प्रेरित केले होते. दोन दुःखद घटना घडून सुद्धा अंतिम संस्काराला त्याला येता आले नव्हते. याची खंत त्यांनी बोलून दाखविली. त्यावेळी त्याला अश्रू अनावरण झाले. त्याचा मोबाइल सुद्धा चोरीला गेल्याने त्याची तक्रार घेण्यास कशी टाळाटाळ केली होती याचा अनुभव सुद्धा त्याला आला आहे. आता मात्र त्याच क्षेत्रातील प्रशासकीय अधिकारी झाला आहे.

बिरदेव डोणे यांच्या घरच्या परिस्थितीचा विचार करता केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊनसुद्धा खांद्यावरील घोंगडी सोडली नाही. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर मेंढीलासुद्धा त्यांनी कडेवर उचलून घेतले होते. त्याची आनंद मिरवणूक काढण्यात आली त्यावेळी सुध्दा त्यांनी आपल्या खांद्यावर घोंगडी व डोक्यावर पांढरी टोपी परिधान केली होती. कारण त्याच्या यशाची साक्ष ती घोंगडी व टोपी सांगत होती. त्यांने आता इतिहास घडविला आहे. बिरदेव आपल्या यशाची वाटचाल सांगत असताना भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आनंदाने सांगायला विसरला नाही. हीच खरी मोठी शक्ती त्याच्या जीवनात होती. महत्त्वाची बाब म्हणजे, पहिल्या दोन प्रयत्नामध्ये जरी त्याला अपयश आले तरी त्यांनी जिद्द सोडली नाही आणि तिसऱ्या प्रयत्नात इतिहास घडविला. बिरदेव डोणे यांनी पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदवी प्राप्त केली असली तरी त्याचे शालेय शिक्षण गावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. जय महाराष्ट्र हायस्कूलमध्ये त्याचे माध्यमिक, तर मुरगुड येथील शिवराज विद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाया रचला. त्याला दहावीमध्ये ९६ टक्के, तर बारावी विज्ञान शाखेमध्ये ८९ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला होता. त्यावेळी तत्कालीन शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांनी त्याच्या यशाचे कौतुक करण्यासाठी शाळेला पत्र पाठविले होते. बिरदेव डोणे याला केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या लेखी परीक्षेत ७७५ गुण, मुलाखतीत १६० गुण असे एकूण ९३५ गुण मिळाले होते. यासाठी त्यांनी समाजशास्त्र हा वैकल्पिक विषय निवडला होता. त्यांनी या संधीचे सोने केले असेच म्हणावे लागेल. यावरून त्याचा आत्मविश्वास सहज लक्षात येतो. याचे आत्मपरीक्षण आजच्या तरुणाईने करणे गरजेचे आहे.

यासाठी केवळ आर्थिक परिस्थिती असून चालत नाही तर लागते ती म्हणजे मनाची तयारी, मनाची जिद्द, मनाची मेहनत, मनाचा आत्मविश्वास तरच यशवंत होऊ शकतो हे बिरदेव डोणे यांनी देशाला दाखवून दिले आहे. त्याबद्दल तमाम महाराष्ट्र जनतेच्या वतीने आयपीएस बिरदेव डोणे याचे अभिनंदन करून त्याला त्याच्या पुढील देशसेवेला आणि प्रशासनातील कारकिर्दीस हार्दिक शुभेच्छा..!

मुंबई महानगरपालिका निवडणुका घ्याव्यात

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका येत्या चार महिन्यांत घ्यावेत असा आदेशच आता सुप्रीम कोर्टाने दिला आहे. राज्यातील पंचायत समित्यापासून ते महापालिकाच्या निवडणूका मागील पाच ते तीन वर्षापासून त्यांच्या नियोजित वेळेवर होऊ शकल्या नाहीत. मविआच्या काळात यासर्व निवडणुका वेळेवर होऊ शकल्या नाहीत. कधी कोविड प्रादुर्भाव कारणांमुळे तर कधी ओबीसी आरक्षणनिमित्त झाल्याने राज्यात निवडणूका घेता आल्या नाहीत. पण मात्र लोकसभेसाठी आणि विधानसभेसाठी निवडणूका वेळेवर झाल्या आहेत. दोन्ही निवडणूकीत मविआला यश संपादन करता आलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने जवळजवळ तीन वर्षानंतर निर्णय दिला आहे की स्थानिक पातळीवरील म्हणजे नगरपालिका,पंचायत पालिका यांच्या निवडणूका येत्या चार महिन्यात घेण्यात यावा. पण हाच निर्णय तथा आदेश मुंबई महापालिकेच्या बाबतीत देखील आहे का याबाबतीत स्पष्टता मिळालेली नाही. म्हणूनच तर आर्थिक राजधानी असल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणूका यापुढे तरी म्हणजे आता तरी घेतल्या गेल्या पाहिजे,असे वाटते.

- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला

श्रेयवाद नको...

२२ एप्रिलला झालेला हल्ला आणि निष्पाप जीवांचा बळी ह्यामुळे देशात संतापाची लाट उसळली आणि पाकीस्तानला धडा शिकवा ही जनतेची मागणी दहशतीच्या अड्ड्यांवर भारतीय लष्कराने हल्ला करुन दमदार सुरुवात केलेली आहे आणि ह्याचे श्रेय मोदीजी आणि राजनाथसिंह ह्यांना देण्याचा मोठेपणा विरोधी पक्षाने दाखवून पुढच्या लढाईत 'हम सब एक है' हे जगाला दाखवून दिले पाहिजे.लष्कराला निर्णय देण्याची मोकळीक दिली तर सकारत्मक यश मिळू शकते हे सिध्द झाले. त्यामुळे लष्कराला सलाम! फक्त सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांचे गुणगान गातांना तारतम्य ठेवून श्रेयवादाची लढाई सुरु करु नये.

- अरुण का. बधान, डोंबिवली

सामान्य नागरिकांना लक्ष्य करणे चुकीचे

भारतीय हवाई दलाने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान १०० दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. तर पाकिस्तानी लष्कराकडून 'एलओसी'वरील रहिवासी भागांना आणि नागरिकांना लक्ष्य केले जात आहे. लष्करी हल्ल्यात किमान १३ नागरिकांचा मृत्यू व ५७ जण जखमी झाले आहेत. पाकिस्तानच्या हल्ल्याला भारत जोरदार प्रत्युत्तर देत असल्याने सामान्य नागरिकांना लक्ष्य करणे चुकीचे आहे. भारत-पाक संघर्षामुळे सीमावर्ती भागातील स्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. पाकिस्तानचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरत असताना भारताने लष्करी हल्ल्यात पाकिस्तानी हवाई संरक्षण रडार आणि प्रणालींना लक्ष्य करून निष्क्रिय केले. केंद्र सरकारने संभाव्य धोक्यासाठी सीमेलगत असलेल्या राज्यांना हाय अर्लट देण्यात आला आहे.पाकिस्तानला युध्द करायचे असल्यास खुलेआम करावे. सामान्यांना लक्ष्य करणे हे युद्ध नव्हे. सीमेलगत तणाव वाढवण्याबद्दलचा निर्णय हा पूर्णपणे पाकिस्तानचा असेल.

- विवेक तवटे, कळवा , ठाणे

पाकिस्तान दशहतवादी राष्ट्र

हिंदुस्थाने दशहतवादी राष्ट्र पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्रॉईक करून अनेक दशहतवादी तळ उध्वस्त केले त्याचे दिडशेच्या वर दशहतवादी मारले आणि पाकिस्तान दशहतवादी राष्ट्र आहे हे जगाला दाखवून दिले त्यात भर म्हणून स्वतः पाकिस्तानी सैनिकांनी त्यांच्या इथे मारलेल्या दशहतवाद्याना मानवंदना देऊन जगाला दाखवून दिले की, आम्ही दशहतवाद कसा पोसतो आणि त्याला वाढवतो हिंदुस्थानच्या सर्जिकल स्ट्राइकनंतर हिंदुस्थानच्या दशहतवाद विरोधी मोहीमेत अनेक राष्ट्राने पाठिंबा दिला अमेरिकेने तर पाकिस्तानला हिंदुस्थानला कोणतेही प्रतिउत्तर देऊ नये अशी मनाई केली. तरीही आपल्या मारल्या गेलेल्या दशहतवाद्यानसाठी पाकिस्ताने हिंदुस्थानावर ड्रोन मिसाईल आणि चायना बनावटीच्या लढाऊ विमानाने हल्ले सुरू केले तसे गेले काही दिवस पाकिस्तान कडून सीमा रेषेवर गोळीबार आणि तोफांनी हल्ला सुरुच आहे आणि या सगळ्यांना हिंदुस्थानची त्रिमूर्ती म्हणजे सैनिक भुदल, हवाई दल आणि नौदल सगळेच चोख प्रतिउत्तर देत आहेत आज हिंदुस्थाने जगाला आपली ताकद दाखवून दीली आहे आणि पाकिस्तान दशहतवाद्याना कसे पोसते वाढवते आणि मानवंदना ही देते हे दाखवून दिले आहे आता जगाने पाकिस्तानला दशहतवादी राष्ट्र घोषित करावे.

- मयूर प्रकाश ढोलम, जोगेश्वरी

राशिभविष्य

शनिवार, १० मे २०२५

॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख शुद्ध त्रयोदशी शके १९४७. चंद्र नक्षत्र चित्रा योग सिद्ध ,चंद्र राशी कन्या,भारतीय सौर २० वैशाख शके १९४७ म्हणजेच शनिवार दिनांक १० मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.६, मुंबईचा सूर्यास्त ७.३ मुंबईचा चंद्रोदय ५.१४, मुंबईचा चंद्रास्

पुणे शहरात शुक्रवारी दिवसभर ठिकठिकाणी पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी जोरदार, तर काही ठिकाणी तुरळक पाऊस पडला. पावसासोबत जोरदार पावसानेही हजेरी लावल्याने पुणेकरांची तारांबळ उडाली. अवकाळी पावसामुळे प्रवाशांचे मात्र हाल झाले. (छाया : मंदार टण्णू)

वेचक

विमानतळावर दिसलेला बिबट्या अद्यापी मोकाटच

पुणे : लोहगाव विमानतळावर दिसलेला बिबट्या अद्यापही मोकळाच असून, त्या भागात लावलेल्या कॅमेऱ्यामध्ये तो दिसल्याचे वनविभागातर्फे सांगण्यात आले. मात्र, अद्याप तो वनविभागाने लावलेल्या कोणत्याच

जाळ्यात सापडत नसल्याचे दिसून आले आहे. १३ कॅमेरा ट्रॅप्स, चार पिंजरे आणि चार मॉनिटर करणारे कॅमेरे या भागात लावण्यात आले आहेत. मंगळवारी यातील एका कॅमेऱ्यात बिबट्या दिसला होता. मात्र, अद्याप या कोणत्याच ट्रॅपमध्ये तो अडकला नसून त्याचा मुक्त संचार या भागात सुरू आहे. या लावलेल्या कॅमेऱ्यांच्या सहाय्याने त्याचे मॉनिटरिंग सुरूच आहे. या भागात त्याची गुजराण बहुतांश भटक्या कुत्र्यांवरच असावी, असा अंदाज वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. ज्यावेळी हा बिबट्या कॅमेऱ्यात दिसला होता, त्यावेळी त्याची हालचाल ही ॲग्रेसिव्ह नव्हती. त्यामुळे त्याची भूक या कुत्र्यांवरच भागत असावी, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ज्यावेळी त्याला अन्न मिळत नाही, त्यावेळी तो अन्नाच्या शोधार्थ वेगवान हालचाली करतो. अशावेळी तो प्राण्यांवर, माणसांवर हल्ले करतो. मात्र, सध्या असा कोणताच प्रकार या बिबट्याच्या बाबतीत दिसून आलेला नाही. त्यामुळे त्याची अन्नाची गरज भागत असावी, असा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. मात्र, अजूनही तो त्याच भागात फिरत असल्याने ही चिंतेची बाब आहे.

ओतूरमध्ये बांगलादेशी यांना अटक

जुन्नर : टुरिस्ट, मेडीकल व्हिसावर भारतात येऊन कोणत्याही वैध कागदपत्राशिवाय तसेच भारत बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकारी यांच्या लेखी परवानगीशिवाय दोन बांगलादेशी नागरिक पुणे जिल्ह्यातील जुन्नर परिसरात ओतूर येथे येऊन राहत होते. याबाबत पुणे दहशतवाद विरोधी पथकाच्या सूचनेनुसार ओतूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत दोन बांगलादेशींना अटक केली आहे. ताजमीर मुश्तफा अन्सारी (वय-२८) व अलीमुन गुलाम अन्सारी (२७, दोघे म. रा. बोईकारी, ता.जि. सातखिरा, बांगलादेश) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपी ताजमीर अन्सारी याचे मूळ नाव मोहम्मद ताजमीर हुसेन मोहम्मद गुलाम मुस्तफा असून तो टुरिस्ट व्हिसावर भारतात आला होता. २५/१/२०२४ ते २३/७/२०२४ या दरम्यान त्याला टुरिस्ट व्हिसा देण्यात आला होता. अलीमुन गुलाम अन्सारी याचे मूळ नाव अलीमुन कादेर मोहम्मद गुलाम हुसेन असे असून तो २४/३/२०२२ ते २३/६/२०२२ यादरम्यान मेडिकल व्हिजावर भारतात आलेला होता. आरोपी अलीमुन अन्सारी याने बनावट आधारकार्ड देखील या ठिकाणी बनवले असून त्याबाबत त्याला विचारणा केल्यावर त्याने संबंधित आधारकार्ड हे नारायणगाव एसटी स्थानकसमोर फुलसुंदर मार्केट येथे आधारकार्ड बनविण्याचे कॅम्प चालू असताना केल्याचे सांगितले.

भूमिपुत्रांच्या हक्कांबाबत 'नो कॉम्प्रमाईज'

पिंपरी : 'भूमिपुत्रांचा स्वाभिमान आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष' हेच माझ्या राजकीय व सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासन टीपी स्कीम लादण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये टीपी स्कीम होऊ देणार नाही, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांना दिला आहे. टाळगाव चिखली येथे श्री गणेश मंदिरामध्ये आज श्री भैरवनाथ टीपी स्कीम विरोधी कृती समितीच्या पुढाकाराने सर्व ग्रामस्थ, आजी-माजी पदाधिकारी, भूमिपुत्रांची बैठक घेण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने स्थानिक आमदार महेश लांडगे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून ३ ते ४ वेळा आमच्या हक्काच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. १९७० च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग-धंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करून आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. १९९७ मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महानगरपालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी बोलून दाखवल्या.

दक्षिण पुण्यात आजही पाणीबाणीचे संकट कायम

◆ पुणे (प्रतिनिधी):

पाणीकपातीचा निर्णय मागे घेऊनही दक्षिण पुण्यातील पाणीबाणी कायम आहे. काही भागांत अपुरा पाणीपुरवठा होत आहे, तर काही भागांत दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे समोर आले आहे. समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत दक्षिण पुण्याला पाणीपुरवठा करण्यासाठी १२ टाक्या उभारण्यात येणार असून, यातील दोनच टाक्या कार्यान्वित असल्याने या परिसरातील रहिवाशांना नियमितपणे पाणी मिळत नसल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे.

धरणात पुरेसा पाणीसाठा असतानादेखील गेल्या आठवड्यात दक्षिण पुण्यात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाणीकपातीचा निर्णय घेत दिवसाआड पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली होती. या निर्णयावर नागरिकांनी व विविध राजकीय व सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त करत आक्रमक भूमिका घेतली होती. फक्त दक्षिण पुण्यावरच अन्याय का, असा सवाल नागरिकांनी केला होता. नागरिकांचे संताप लक्षात घेऊन दक्षिण पुण्यावरील पाणीकपात रद्दची घोषणा करण्यात आली असली, तरी अद्यापही या भागातील काही परिसरात पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

कात्रज-कोंढवा रस्ता भागात दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. यासह सुखसागर, गोकूळनगर, शिवशंभोनगर, स्वामी समर्थनगर, साईनगर, कात्रज, संतोषनगर या भागांतदेखील पाणीपुरवठा अनियमित होत आहे. उंच-सखल भाग असे कारण देत कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे दक्षिण भागातील पाणीप्रश्न हा आजही कायम आहे. येथील लोकसंख्येच्या तुलनेत जलवाहिन्यांचे जाळे कमी असल्याने नागरिकांना रोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे कात्रज-कोंढवा भागात दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो.

समान पाणीपुरवठ्यासाठी दिवसाआड पाणीपुरवठा

समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत ६५ टाक्या उभारण्यात येणार असून, यातील ११ ते १२ टाक्यांचे काम राहिले आहे. कोंढवा येथे काही कामे सुरू असून, ती कामे पूर्ण झाल्यावर या टाक्यांचे काम होऊन त्यांना नियमित पाणीपुरवठा केला जाणार असल्याचे पालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे उपायुक्त नंदकिशोर जगताप यांनी सांगितले. दरम्यान, कोंढवा वडगाव जलशुद्धीकरण केंद्रातून कात्रज पंपिंग स्टेशनद्वारे केदारेश्वर, महादेवनगर, आगम मंदिर अशा तीन पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी सोडले जाते. मात्र, या भागाला मिळणाऱ्या पाणीसाठ्यापैकी कमी पाणी मिळते. दक्षिण पुण्यातील कात्रज-कोंढवा भागाला रोज १६५ एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. वडगाव जलकेंद्रातून हा पाणीपुरवठा केला जातो. हे पाणी कात्रज, कोंढवा, सिंहगड, धनकवडी, येवलेवाडी व बिबवेवाडीच्या काही भागांत दिले जाते. मात्र, या भागातील लोकसंख्या जास्त असल्याने या पाण्याचा समान पाणीपुरवठा व्हावा, यासाठी दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिका १२ टाक्या उभारणार

> समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत ६५ टाक्या उभारल्या जाणार आहेत. दक्षिण पुण्यात ११ ते १२ टाक्या बांधल्या जाणार आहेत. यातील काही टाक्यांचे काम झाले आहे. मात्र, काही टाक्यांचे काम हे राहिले आहेत. काही ठिकाणी भूसंपदनाचा विषय आहे. हा विषय लवकरच मार्गी लावला जाईल. सध्या दक्षिण पुण्याला २५० एमएलडी पाणी पुरवले जाते. कोंढवा येथील काही कामे झाल्यास येथील पाणीपुरवठा सुरळीत होईल.
> - **नंदकिशोर जगताप,** उपायुक्त पाणीपुरवठा विभाग, महापालिका

न्यायालयाकडून आठ आठवड्यांची मुदत

पिंपरी-चिंचवडमधील हजारो कोटींच्या गृहप्रकल्पांच्या मंजुरीचा तिढा सुटला

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

पिंपरी-चिंचवडमधील हजारो कोटी रुपयांच्या गृहप्रकल्पांच्या पर्यावरण मंजुरीचा तिढा अखेर नऊ महिन्यांनी सुटला आहे. या प्रकल्पांना राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीने मंजुरी द्यावी, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी आठ आठवड्यांची मुदतही न्यायालयाने दिली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भोवतालच्या पाच किलोमीटर परिसरातील २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या समितीकडून परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. हा परिसर जास्त प्रदूषित असल्याचे सरकारी यंत्रणेचे म्हणणे होते. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने याबाबत जानेवारी महिन्यात अधिसूचना काढली. त्यानुसार राज्यपातळीवरील पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीकडून मोठ्या प्रकल्पांना पूर्वीप्रमाणे मंजुरी देण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र, या अधिसूचनेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळाली होती. याप्रकरणी 'क्रेडाई', पुणेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

या निर्णयामुळे गुंतवणूकदारांना, बांधकाम व्यावसायिकांना व नव्याने सदनिका विकत घेऊ पाहणाऱ्या सदनिकाधारकांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळाला आहे.

विक्रीतून मिळणाऱ्या महसुलात घट

पुण्याचा विचार करता शंभराहून अधिक प्रकल्पांना याचा फटका बसला. या प्रकल्पांची एकूण किंमत सुमारे ३० हजार कोटी रुपये आहे. यात २० हजार ते दीड लाख चौरस मीटरपर्यंतच्या मोठ्या गृहप्रकल्पांचा समावेश होता. हे प्रकल्प सहा महिन्यांहून अधिक काळ रखडल्याने विकासकांना फटका बसला. याचबरोबर हे प्रकल्प रखडल्याने गेल्या वर्षी घरांचा पुरवठा कमी झाला. सरकारला विकासकांकडून आणि घरांच्या विक्रीतून मिळणारा महसूलही कमी झाला. त्यामुळे या निर्णयाचा परिणाम ग्राहक ते विकासक या साखळीतील सर्व घटकांबरोबरच घरांच्या किमतींवरही झाला.

> पिंपरी-चिंचवड महापालिका आणि आजूबाजूचा पाच किलोमीटर परिसर सर्वाधिक प्रदूषित नसतानाही राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीने येथील गृहप्रकल्पांना मंजुरी देण्यास नकार दिला होता. याविरोधात 'क्रेडाई'ने उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने 'क्रेडाई'च्या बाजूने निकाल दिला असून, समितीला आठ आठवड्यांत प्रकल्पांना मंजुरी देण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे गृहनिर्माण क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे.
> – **मनीष कनेरिया,** पर्यावरण समिती, 'क्रेडाई', पुणे.

> पिंपरी-चिंचवडच्या परिसरातील सर्वंकष पर्यावरण प्रदूषण निर्देशांक २०२४ मध्ये ३२.५२ होता. सर्वाधिक प्रदूषित वर्गवारीसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा हे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे शहर सर्वाधिक प्रदूषित भागाच्या निकषात बसत नाही. येथील प्रकल्पांना पूर्वीप्रमाणे राज्याच्या समितीकडून मंजुरी मिळावी, अशी मागणी बांधकाम व्यावसायिकांनी न्यायालयाकडे केली. यावर उच्च न्यायालयाने, 'पिंपरी-चिंचवडमधील प्रकल्पांना सध्याच्या सर्वंकष पर्यावरण प्रदूषण निर्देशांकाच्या आधारे आणि नियमानुसार राज्याच्या समितीने परवानगी द्यावी,' असे निर्देश दिले. यासाठी आठ आठवड्यांची मुदत उच्च न्यायालयाने दिली आहे.
> - **मकरंद निकम,** शहर अभियंता, महापालिका

गावगुंडांच्या धमक्यांमुळे रिंग रोडच्या कामाला अडथळे

◆ उरुळी कांचन (प्रतिनिधी):

महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतलेल्या पूर्व भागातील रिंगरोडच्या कामाला गावगुंडांचे ग्रहण लागले आहे. गाव गुंडांकडून रस्त्याचे काम करणाऱ्या मजुरांना धमक्या दिल्या जात असल्याचा एक व्हीडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. या गाव गुंडांमुळे बिवरी (ता. हवेली) येथील गोते मळा परिसराअंतर्गत रिंग रोडचे काम मजुरांनी थांबविले आहे.

याबाबत सुरक्षा रक्षक कामगार व रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलिस आयुक्तांकडे लेखी स्वरूपात तक्रार अर्ज देण्यात आला आहे. या तक्रारी अर्जात म्हटले आहे, की जिल्ह्यात सध्या राबविण्यात येणारा रिंग रोड हा प्रकल्प राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी आणि जनहिताचा दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून त्याची वेळेत आणि सुरळीत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे; परंतु नितीन कुंजीर नावाचा सराईत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला इसम, त्याच्या साथीदारासह रिंग रोडच्या कामावर असलेल्या कामगारांना धमकी देणे, दमदाटी करणे आणि मारहाण करणे असे गुन्हे करत आहे. याच्या विरोधात पूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असून, सध्या तो खुलेआम गुन्हे करत आहे.

या गावगुंडाने रिंग रोड कामावर जाऊन कामगारांना काम बंद करा असे सांगत कामगारांना मारहाण केली. साहेबराव बाळू निकाळजे (रा. गावडेवाडी, वाडे बोल्हाई) येथील रहिवाशी काम करत असताना त्याला व जेसीबी मशीन चालक व मजुरांना काठीने मारहाण केली व हात पाय तोडण्याची धमकी दिली. सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन नितीन कुंजीर व त्याच्यासारख्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सुरक्षा रक्षक कामगार व रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आला आहे. वाडे बोल्हाई (ता. हवेली) परिसरातील गावडेवाडी परिसराअंतर्गत रिंग रोडचे काम सुरु आहे. या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांना एका गाव गुंडाकडून काम सुरू केल्यास हात पाय तोडण्याची धमकी देण्यात आली आहे. "ही शेवटची वार्निंग आहे, काम सुरू ठेवल्यास हातपाय मोडू" असा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. गावगुंडाच्या धमकीनंतर मजुरांनी काम थांबवले आहे.

अकरावीसाठी १०० रुपये नोंदणी शुल्क

पुणे : राज्यातील प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामधील इयत्ता अकरावीचा प्रवेश ऑनलाइन पद्धतीने दिला जाणार असून, त्यासाठी राज्य शासनातर्फे स्वतंत्र नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून नोंदणी शुल्क १०० रुपये आकारले जाणार असून, विद्यार्थ्याला आपल्या पसंतीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेता यावा, यासाठी कमीत कमी एक व जास्तीत जास्त दहा पसंतीक्रम ऑनलाइन प्रक्रियेमध्ये नोंदवता येणार आहेत. पुणे, मुंबई यांसह राज्यातील काही मोठ्या शहरांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात होती. परंतु चालू शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनाने प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामधील अकरावीचा प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे.

रिंग रस्ता अचूक मोजमापासाठी जीपीएस प्रणालीचा अवलंब

पिंपरी : पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणअंतर्गत नियोजित चक्राकार वाहतूक रस्ता, इतर अंतर्गत रस्ते आणि प्रकल्पासाठी जीएनएसएस याअंतर्गत जीपीएस प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे जागेच्या ठिकाणी जाऊन त्याचे अचूक मोजमाप घेता येते. तसेच, त्याची नेमकी माहिती व लोकेशनही जतन करून ठेवता येते. यामुळे कमी वेळेत जास्त काम होत असून, पहिल्यांदाच रिंग रस्त्याच्या मोजमापासाठी याचा वापर केला जाणार आहे.

पीएमआरडीएच्या हद्दीत जमीन व मालमत्ता विभागाच्या वतीने नुकतेच भूमापकांना जीएनएसएसबाबतप्रशिक्षण देण्यात आले. रियल टाईम किनमॅटिक या प्रणालीबाबतदेखील माहिती देण्यात आली. कोणत्याही स्थानाचे अवघ्या ३ ते ५ सेंटिमीटरपर्यंत अचूक मोजमाप करणे शक्य होणार आहे. याबाबत प्रशिक्षणात भूमी अभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, उपअधीक्षक शिवाजी पंडित यांनी मार्गदर्शन केले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैशांचा तुटवडा

◆ पुणे (प्रतिनिधी) :

शिरूरसह जिल्हाभरातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील शाखांमध्ये पैशांचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे ऐन लग्नसराईत सभासदांना पैसे मिळत नसल्याने त्यांचे हाल होत आहेत.

नुकताच मार्च एन्ड पार पडला असून, जिल्हा बँकेला कोट्यवधी रुपयांचा नफा झाल्याचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनी काही दिवसांपूर्वीच जाहीर केले आहे. असे असताना महिनाभरापासून जिल्हा बँकेत पैशांचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्हाभरातील सर्व शाखांमध्ये शेतकरी तसेच इतर खातेदारकांना १० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मिळत नसल्याने सर्व हैराण झाले आहेत. जिल्हा बँकेला संलग्न असलेल्या सर्व सहकारी संस्थांच्या शेतकरी सभासदांनी मार्चअखेर आपापले सर्व कर्ज भरले आहे, तर एप्रिलपासून पुन्हा कर्ज वाटपास सुरुवात झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जिल्हा बँकेच्या खात्यावर वाटप झालेल्या कर्जाची लाखो रुपयांची रक्कम जमा झाली आहे; परंतु यातील १० हजारांपेक्षा

शेतकऱ्यांना, सभासदांना घरातील लग्नांमध्ये अडचणी निर्माण

अधिक रक्कम काढता येत नाही. याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी उसने पैसे घेऊन बँकेचे कर्ज भरले आहे; परंतु पुन्हा जादा पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांना लोकांचे पैसे परत करता येत नाहीत.

काही शेतकरी, सभासद यांच्या मुला-मुलींची लग्न होत आहेत; परंतु जिल्हा बँकेतून पैसे मिळत नसल्याने त्यांची लग्न कशी करणार, असा यक्ष प्रश्न सभासद शेतकऱ्यांपुढे उभा आहे. याबाबत जिल्हा बँकेच्या स्थानिक शाखांमधील शाखा व्यवस्थापकांना विचारले असता तालुक्याच्या मुख्य शाखेकडून कमी पैसे उपलब्ध होत आहेत. तसेच प्रतिखातेदार १० ते ३० हजारपेक्षा अधिक रक्कम न देण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्याचे त्यांनी सांगितले.

मोर्चेबांधणीसाठी गावोगाव, वाड्या-वस्त्यांवर इच्छूकांकडून टँकरने मोफत पाणीपुरवठा

◆ राजगुरुनगर (प्रतिनिधी):

स्थानिक स्वराज्य संस्था इच्छुकांच्या पाणीटंचाई पथ्यावर

पंधरा दिवसांपूर्वी जिल्ह्यात थेट जनतेतून व तेही ५ वर्षांसाठी सरपंचपदाचे आरक्षण सोडत जाहीर झाली आणि नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने पुढील ४ महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

याच पार्श्वभूमीवर सध्या सरपंचपदांसाठी, नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. यात सध्या गावांमध्ये, वाड्या-वस्त्यांवर निर्माण झालेली पाणीटंचाई इच्छुकांच्या पथ्यावर पडत आहे. अनेक इच्छुकांकडून मोठी पोस्टरबाजी करत टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा सुरू केल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागासह नगरपालिका क्षेत्रात दिसत आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश

देत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे तब्बल चार ते पाच वर्षांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. यामुळेच सध्या ग्रामीण भागात नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी इच्छुक उमेदवारांकडून जोरदार तयारी सुरू आहे. स्वतःचे ब्रॅण्डिंग करण्यासाठी मतदारसंघातील लग्नकार्य, जत्रा-यात्रांचा उपयोग केला जात आहे. याशिवाय खेडसोबतच जुन्नर, आंबेगाव तालुक्यात इच्छुकांकडून सध्या मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांची देखील सोय होत आहे.

स्थानिक पातळीवर व्यवस्थाच विस्कळीत

राज्यासह पुणे जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तब्बल चार-पाच वर्षांपासून रखडल्या आहेत. पुणे जिल्हा परिषद, १३ पंचायत समित्यांसह तब्बल ११-१२ नगरपालिकांवर प्रशासक काम करत आहे. यंत्रणेचे काम सुरू असले, तरी लोकनियुक्त प्रतिनिधी नसल्याने प्रशासन व लोकांची नाळ मात्र तुटल्यासारखी झाली आहे. स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांची व्यवस्थाच विस्कळीत झाली आहे. त्यामुळेच आता प्रत्येकालाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत.

लावणीपासून ते महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमांना मिळतेय पसंती

यात्रा-जत्रांसाठी लोककलावंतांचे महाराष्ट्रभर लोककलांचे सादरीकरण

◆ पुणे (प्रतिनिधी):

लावणीपासून ते महाराष्ट्राची लोकधारापर्यंत. शाहिरीपासून ते जागरण, या महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल लोककला. चैत्र पाडव्यानंतर यात्रा-जत्रांचा सीझन सुरू झाल्यावर खऱ्या अर्थाने लोककलांच्या कार्यक्रमांचीही संख्या वाढते. यंदाही असेच चित्र आहे. चैत्र पाडव्याला यात्रा-जत्रा सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रातील शहरी भागांसह ग्रामीण भागांतही लोककलांचे कार्यक्रम रंगू लागले आहेत. त्यामुळेच आता लोककलावंतही महाराष्ट्रभर दौरे करून कलेचे सादरीकरण करत आहेत.

यावर्षी लोककलांच्या कार्यक्रमांना चांगले बुकिंग मिळाले आहे आणि त्याचा आर्थिक फायदाही

कलावंतांना होत आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत लोककलांचा कार्यक्रम रंगणार असून, कलावंतांसाठी यंदाचा सीझन आनंद घेऊन आला आहे. सध्या ग्रामीण भागात यात्रा-जत्रा सुरू झाल्या असून, लोककलांच्या कार्यक्रमांना यात्रा-जत्रांमध्ये प्रतिसाद असतो. यंदाही हाच प्रतिसाद पाहायला मिळत असून, लोककलावंत कार्यक्रमांसाठी राज्यभर प्रवास करीत आहेत.

लोककलावंतांच्या संपूर्ण समूहाचे कार्यक्रमांसाठी ठिकठिकाणी दौरे

तमाशा, लावणी, महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमांना सर्वाधिक प्रतिसाद आहे. खास करून कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, धाराशिव, अहिल्यानगर आदी ठिकाणी लोककलांचे कार्यक्रम होत असून, कलावंतांना विविध संस्थांकडून कार्यक्रमांसाठी विचारणा होत आहे. त्यामुळेच लोककलावंतांचा संपूर्ण समूह कार्यक्रमांसाठी ठिकठिकाणी दौरे करत आहे. याविषयी शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीचे अध्यक्ष शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, यात्रा-जत्रांमध्ये लोककलांच्या कार्यक्रमांसाठी कलावंतांना विचारणा सुरू झाली आहे. खऱ्या अर्थाने कलावंतांसाठी हाच काळ कमाईचा असतो. यावर्षी कार्यक्रमांसाठी कलावंत राज्यभर दौरे करत असून, विशेष करून ग्रामीण भागातील यात्रा-जत्रांमध्ये कार्यक्रम सादर होत आहेत.

...असे आहे अर्थकारण!

आत्ताच्या घडीला एक लोककलावंत महिन्याला सात ते आठ कार्यक्रम सादर करत आहे. पारंपरिक वेशभूषेत लोककलांचे सादरीकरण होत असून, यात्रा-जत्रांमध्ये लोककलांच्या कार्यक्रमांना सर्वाधिक मागणी आहे. एका कार्यक्रमासाठी ४ ते १५ हजार रुपयांपर्यंतचा आर्थिक मोबदला मिळत आहे. मार्च महिन्यापासून कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. जागरण गोंधळच्या कार्यक्रमांसाठी विविध जिल्ह्यांचा दौरा करत असून, पुण्यासह सांगली, सातारा, कोल्हापूर, अमरावती आदी जिल्ह्यांमध्ये कार्यक्रम केले आहेत, आत्ताही कार्यक्रमांसाठी प्रवास सुरू आहे. मे महिनाअखेरपर्यंत लोककलांचे कार्यक्रम रंगणार आहेत.
- **राहुल पवार,** लोककलावंत.

...या लोककलांचे सादरीकरण

शाहिरी असो वा भारूड. कीर्तन असो वा वासुदेव. अशा लोककलांनी महाराष्ट्राच्या मातीला समृद्ध केले. लोककलांच्या कार्यक्रमांना कोकण विभाग असो वा जळगाव. शाहिरी, वासुदेव, पोतराजसह महाराष्ट्राची लोकधारा आदी कार्यक्रमांचे कलाकार ग्रामीण भागात सादरीकरण करत आहेत.

पिंपळे निलखमध्ये 'जिथे कचरा तिथे सेल्फी पॉइंट'

◆ पिंपरी (प्रतिनिधी):

जशी शहर वाढत गेली तशी लोकसंख्या वाढली आणि त्या सोबत वाढली कचऱ्याची समस्या. शहरात कचऱ्याचे ढीग उभे राहू लागल्यामुळे मोकाट जनावरांचा त्रास सुरू झाला आणि यावर कोणतीही उपयोजना महापालिकेकडे नव्हती. महापालिका प्रशासन नेहमीच या बाबतीत आपली अनास्था दाखवत आलीच आहे आणि आता ही दाखवत आहे. यावर प्रत्युत्तर म्हणून हीच बाब रविराज काळे यांनी हेरली आणि विचार सुरू झाला हे कस सुधारता येईल आणि जन्म झाला कचऱ्यातून सेल्फी पॉइंट या संकल्पनेचा. शहरातील कचऱ्याचे ढीग बाजूला सारून तेथील जागा व्यवस्थित रंग रांगोटी करून तिथे सेल्फी पॉइंट उभे करण्यात आले. याची सुरुवात पिंपळे निलख बस स्टॉपच्या मागे असलेला कचऱ्याचा ढीग साफ करण्यात आला आणि या नव्या संकल्पनेला खऱ्या अर्थाने सत्यात उतरवण्यात यश आले. या वेळी रविराज काळे म्हणाले की, समस्या येत राहणार. त्यावर उपयोजना कशी करता येईल आणि ती अधिकाअधिक सुंदरपणे कशी राबवता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे .

शिवणीमध्ये बुद्ध जयंती महोत्सव

सोहळा

तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना अनावरण:भिक्खु धम्मशिल थेरो

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:या जगाला प्रज्ञा, शिल, करुणेची शिकवण देणाऱ्या तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्ताने तथागत बुद्ध रुप प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा बुद्ध जयंती महोत्सव बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे सोमवार (दि.१२) मे रोजी संपन्न होत आहे. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड विनीत बुद्ध जयंती महोत्सवात उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिध्दी दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, कार्यक्रमाचे उदघाटक डॉ. भिक्खु उपगुप्त माथेरो तर अध्यक्ष म्हणून भिक्खु इंदवंस्स, प्रमुख उपस्थिती भिक्खु चंद्रमुणी असणार आहेत. प्रमुख धम्मदेसना भिक्खु महाकाश्यप थेरो, भिक्खु धम्मघोष, भिक्खु पय्यावर्धन तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड कलेक्टर विवेक जॉन्सन, सीईओ आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रदिप भोगले, नायब तहसीलदार सुहास हजारे, समाज कल्याण अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, अभियंता व्ही.एल.कांबळे, संपादक कुणाल कांबळे असणार आहेत. विशेष अतिथी म्हणून एमएसआरडीसी मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक इंजि.अनिल » पान २ वर

बीडमध्ये पहिल्यांदाच होणार रात्रभर महापरित्राण पाठ

श्रीलंकेचे प्रशिक्षिक भिक्खु राहणार उपस्थित

बीडमध्ये पहिल्यांदाच श्रीलंका येथील भिक्खु अश्वजित थेरो, भन्ते शीलवान, भिक्खु बुद्धभुषण, उपस्थित राहणार असून सोमवार (दि.१२) मे रोजी सकाळी ९ ते सकाळी ६ पर्यंत रात्रभर महापरित्राण पाठ होणार आहे. उपासकांनी सहभागी होवून पुण्य अर्जित करावे.असे आवाहन करण्यात आले आहे.

असे होणार कार्यक्रम

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून सकाळी ८ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची मिरवणूक होईल. शिवणी येथील महाविर धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर येथे सकाळी ९ ते १२ सांस्कृतिक भिम बुद्ध गीतांचा कार्यक्रम, सकाळी १० ते १२ भोजनदान, दुपारी १ ते ४ वाजता भिक्खु संघाची धम्मदेसना होणार आहे.

स्पर्धा परीक्षेत मिळविले यश

अभिनंदनिय:अरुणा मिटकरी यांनी मिळविले यश

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील कन्हेरवाडी येथील अरुणा पांडुरंग मिटकरी हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत गौळीरपीं एपसळपशशीळपस या अत्यंत प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.कु.अरुणा पांडुरंग मिटकरी यांचे शिक्षण जि.प.प्रा. शाळा कन्हेरवाडी येथे सातवी पर्यंत झाले व एसएससी पर्यंतचे शिक्षण विद्या भवन हायस्कूल कळंब येथे झाले तेव्हा पासूनच महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेची तयारी केली होती म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली आणि मला हे यश प्राप्त करता आले.याचे सगळे श्रेय माझी आई, वडिल आणि मला मार्गदर्शन केले त्यांना जाते माझी एक्झाम फक्त माझी नसायची ती अख्या परिवाराची असायची जेव्हा जेव्हा अपयश आले तितक्या वेळा त्यांनी पुन्हा मेहनत करण्याची ताकद दिली त्यांच्या सहकार्याने मला यश मिळु शकले तसेच हे यश माझ्या पुर्ण कुटुंबाचे आहे हा प्रवास खरंच सोपा नव्हता पन सातत्य, संयम,कठीण परिश्रमात आई,वडील,शिक्षक आणि माझे नातेवाईक यांचे सहकार्य आणि त्यांच्या आशिर्वादामुळेच सोपा होऊ शकला या यशाच्या निमित्ताने मी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याऱ्या सर्व विद्यार्थ्यांना एकच सांगू शकते स्वप्न मोठे पहा ते मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा आणि नेहमी लक्षात ठेवा की शांततेच्या काळात जितका अधिक घाम गाळाल तसेच युद्धाच्या काळात तितकंच कमी रक्त सांडाल व स्वतःवर विश्वास ठेवा प्रयत्न थांबू नका यश » पान २ वर

छेडछाडी आरोपातून निर्दोष मुक्तता

निकाल:ॲड.नारायण गोलेंचा प्रभावी युक्तिवाद

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:शहरातील पाटील गल्ली येथे कार्यरत असलेले तात्कालिन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एप्रील २०१८च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव शहरातील पाटील गल्ली भागातील घरात घुसून महीलेची छेड काढुण, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती. सदर तक्रारीवरून तपासी अंमलदार डीए सरवदे यांनी तपास केला व तपासानंतर आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले व त्यामध्ये फिर्यादी, साक्षीदार,तपासी अंमलदार यांचे जबाब नोंदवल्यानंतर आरोपीचे विधीज्ञ ड.नारायण गोले यांनी प्रकरणात अंतिम युक्तिवाद केल्यानंतर दि.०८ मे रोजी आरोपी लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांची माजलगाव येथील चौथे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्री एम ए कुलकर्णी साहेब यांनी सबळ पुराव्याअभावी आरोपी निर्दोष मुक्तता केली.

प्रकरणी हकिकत अशी की,शहरातील पाटील गल्ली भागातील तात्कालीन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एप्रील २०१८च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव शहरातील पाटील गल्ली भागात राहणाऱ्या एका महिलेची घरात घुसून छेड काढुण,शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती, सदर फिर्यादी वरुन आरोपी गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात गु.र.न.१२७/२०१८ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४५२,३५४,५०४,५०६ प्रमाणे नोंदवण्यात आला होता, प्रकरणात तपासी अंमलदार डी के सरवदे यांनी प्रकरणात साक्षीदार यांचे जबाब नोंदवून व तपास करुन आरोपी विरुद्ध » पान २ वर

गुरुप्रसाद यादवचे यश

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय थरमल परळी वैजनाथ मधील बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी गुरुप्रसाद रेवन्नाथ यादव यांनी बारावी परीक्षेत ८८.१७% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले. गुरुप्रसाद च्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य ,प्राध्यापक यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

परळीचे नाव सकारात्मक दृष्टीने नक्की घेतले जाईल

मयंक गांधी: शाही थाटात सामुदायिक विवाह सोहळा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:चुकीच्या घडलेल्या घटनांमुळे मागील काही दिवसांत परळीचे नाव बाहेर खराब अर्थाने घेतले जात आहे. परळीची झालेली ही ओळख आपल्याला पुसून टाकायची असून समाजोपयोगी कामांनी आपली ओळख भविष्यात सकारात्मक दृष्टीने झालेली असेल. यासाठी आपल्याला सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा उत्कर्ष साधण्यासाठी मोठी सामाजिक चळवळ उभी करायची असून त्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने शनिवारी परळीत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी नववधू वरांना शुभेच्छा देताना ते बोलत होते.

आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे कौतुक

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळा हा अगदीच आगळावेगळा सोहळा असल्याची सर्वत्र चर्चा झाली. हुंडा घेणार नाही आणि देणार नाही अशी सर्वांना या सोहळ्यात शपथ देण्यात आली तर संपूर्ण सोहळा पर्यावरण पुरक करण्याच्या अनुषंगाने प्लॅस्टिकचा शून्य वापर करण्यात आला. या सोहळ्यास हजारो मान्यवर नागरिकांची उपस्थितीत होती.

शनिवार, दिनांक १० मे रोजी परळी वैजनाथ येथे ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बोरोसिल परिवार यांच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा थाटात संपन्न झाला. या » पान २ वर

शहीद जवानाच्या स्मरणार्थ रक्तदान

ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वाढदिवसानिमित्त दिलेल्या सूचनांचे पालन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस ३ मे ते १० मे स्वाभिमान दिवस साजरा केला जातो. परंतु यावर्षी प्रकाश आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना सूचना केली की यावर्षी माझा वाढदिवस साजरा करू नये केक कापू नये व फटाके फोडू नये त्या ऐवजी पहलगाम आतंकी हल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या आणि पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबारात शहीद झालेल्या भारतीय जवानांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करावे अशी सूचना ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिल्या होत्या.

बीड येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी शासकीय रुग्णालय बीड या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले संदेश डोळस, » पान २ वर

पशुवैदयकीय महाविद्यालय जागेची पाहणी

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:पंकजाताई गोपीनाथ मुंडे , मंत्री (पशुसंवर्धन व पर्यावरण)महाराष्ट्र राज्य यांचे प्रयत्नाने परळी येथे नियोजित व शासनाकडून मान्यता मिळालेलंया पशुवैदयकिय महविद्यालयाच्या प्रस्तावित जागेची पाहणी डॉ. नितीन पाटील , कुलगुरू पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर यांनी परळी व लोणी येथे आज भेट देऊन केली . परळी येथील गट क्रमांक ४७८ येथे ५० एकर व लोणी येथील गट नंबर ७ मध्ये २२ एकर अशी ७२ एकर जमिनीचा प्रस्ताव शासनास सादर झाला आहे . आजचे कुलगुरू यांचे पाहणी वेळी डॉ. अनिल भिकाने संचालक विस्तार डॉ. जी एस कांडेकर प्रकल्प अधिकारी, डॉ. अतुल ढोक, प्रमोद तायडे उप अभियंता, अरविंद लाटकर उपविभागीय अधिकारी परळी वै, व्यंकटेश मुंडे तहसीलदार परळी वै , डॉ. आर डी कदम जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड डॉ. एच बी पांडे सर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन परळी वैजनाथ, डॉ. विजय कराड सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन अंबाजोगाई, डॉ. पी एल आघाव पशुधन विकास अधिकारी विस्तार परळी , परवीना पठाण नायब तहसिलदार , मंडल अधिकारी मंगल मुंडे व उडते , तलाठी विष्णु हिते हे उपस्थित होते. आजचे दौऱ्यामुळे पशुवैदयकीय महाविद्यालयाची पुढील कार्यवाही लवकरच होईल असे दिसते . या अनुषंगाने सर्व प्रकिया तात्काळ होण्यासाठी मा. मंत्री पंकजाताई मुंडे यांचे स्तरावरून सतत पाठपुरावा सुरु आहे.

ऊसतोड,वाहतूक करार सोहळा

हंगाम:कार्यक्रमाला लक्षणिय उपस्थिती

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: शेतकऱ्यांच्या हक्काचा डीडीएन एसएफए लि. युनिट-२ साखर कारखाना कै.डॉ. चंद्रकलादेवी नगर, हावरगाव ता.कळंब येथे २०२५-२०२६ या गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतूक करार सोहळ्याचा शुभारंभ शुक्रवार दिनांक ९ मे रोजी उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे विधीवत पूजन श्री.अरुण (काका) चौधरी व मुख्य शेतकी अधिकारी श्री.जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी व तोडणी वाहतूक ठेकेदार तसेच प्रमुख कार्यकर्ते व कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वाच्या उपस्थित प्रथम ११ कराराचे पूजन करण्यात आले.यावर्षी कारखाना पूर्ण क्षमतेने चालवण्यासाठी योग्य नियोजन करण्यात आले असून या कराराचा उद्देश शेतकऱ्यांच्या ऊसाची वेळेत व नियोजित पद्धतीने तोडणी व वाहतूक होऊन त्यांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी पारदर्शक आणि उत्तरदायी यंत्रणा उभारणे » पान २ वर

अजय दाभाडे

३२ किलोमीटर रस्ता कामाची चौकशी करा

११२ कोटी कामाचा दर्जा ढासळला

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:न्यूईटी अंतर्गत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत सुरू असलेल्या गेवराई तालुक्यातल्या जि. बीड चकलांबा- गेवराई - सेलू-लोणाळा ते मारफळा, या जवळपास ३० किलोमीटर राज्य रस्ता कामाची कंत्राटदारांनी अक्षरश: वाट लावली आहे. या प्रकल्पावर देखरेख करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कंत्राटदार एजन्सीला अभय दिल्याने राज्य रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट पद्धतीने करण्यात आले आहे. त्यामुळे, सदरील रस्ता प्रकल्पाच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी शिवसेनेचे तालुका अध्यक्ष अजय भैय्या दाभाडे यांनी केली आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत लोक प्रतिनिधी व्यस्त असल्याचा फायदा, कंत्राटदाराने घेतला. त्यामुळे, १२२.४० कोटी रूपयांच्या रस्ता कामाचा दर्जा ढासळला असून, कंत्राटदारांनी मलिदा चाटल्याची चर्चा होऊ लागली आहे. शिवसेनेचे गेवराई तालुका अध्यक्ष अजय भैय्या दाभाडे यांनी या रस्ता कामा संदर्भात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात प्रथम जिल्हा मार्ग -१६ ते चकलांबा राजपिप्री-गेवराई रोहीतळ-जातेगाव सेलु - लोणाळा-मारफळा ते राष्ट्रीय महामार्ग २२२ रस्ता प्रथम जिल्हा मार्ग - २० किमी ०/०० ते ६४/०० मध्ये जवळपास ३० किलोमीटर अंतरावरचे रस्ता डांबरीकरणाचे काम गेल्या महिन्यानपासून सुरू आहे.

सदरील कामास २०२० - २०२१ मध्ये तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. गेवराई तालुक्यातील चकलांबा येथून रस्ता कामाला सुरुवात करण्यात आली आहे. चकलांबा, माटेगाव मार्गे गेवराई आणि जातेगाव, सेलू, लोणाळा, मारफळा मार्गे होत असलेला हा राज्य रस्ता थेट राष्ट्रीय महामार्गाला जोडला जाणार आहे. त्यामुळे, ग्रामीण भागातील दळणवळणासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील रस्ते विकास गरजेचा असल्याने, हा रस्ता दर्जेदार व्हावा, अशी अपेक्षा होती. परंतू , सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभय मिळाल्याने नियम ,अटीला तिलांजली देऊन,संबंधित कंत्राटदाराने कामाचा दर्जा न ठेवता काम केले आहे. निकृष्ट कामामुळे रस्त्याला जागोजागो तडे गेले आहे. दुतर्फा असलेल्या ड्रेनेजचा दर्जा अत्यंत खालावलेला आहे. सिमेंट, खडीचा वापर व्यवस्थित » पान २ वर

बीडमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅली

आवाहन:देशभक्तांनी सहभागी व्हावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्यावर जशास तसे उत्तर भारत देत आहे. भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी उद्या दि.११ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बीडमध्ये मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे. एक देशभक्त, भारतीय नागरिक म्हणून ही रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान द्वारकाधीश मित्र मंडळाने केले यांनी केले आहे.

भारतीय सैनिकांनी जम्मू काश्मीर मधील पहलगाम हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' राबवत शत्रू राष्ट्र असलेल्या पाकिस्तानवर एअरस्ट्राइक करत प्रत्युत्तर देऊन अनेक दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. पहलगामच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जखमा ओल्या असताना क्षणार्धात पाकिस्तानात घुसून आपल्या भारतीय भुदल,नौदल आणि हवाईदलाच्या जांबाज आधिकाऱ्यांनी आणि जवानांनी दाखविलेल्या साहसाला आणि धैर्याला सलाम करून खरोखरचं देशप्रेमाची भावना जागी करण्यात आली. यामुळे » पान २ वर